म. ग्रं. सं. ठाणें
[विष]य काव्य
[क्र]. ३९५

श्रीराम रत्नगर्भ

काव्ये
१६९९

वि
सं

॥ श्रीगजानन प्रसन्न. ॥



REFBK-0019499

मोनी
कृ

## श्रीगणपतीचें ध्यान.

दंतं शूर्पकर्णं ॥ गजवक्त्रं चतुर्भुजं ॥ पाशांकुशधरं देवं ॥

॥ १ ॥

REFBK-0019499

## तीचें स्तोत्र. ॥

म्य शिरसादेवं गौरीपुत्रं विनायकं ॥ भक्त्या व्यासः स्मरे
त्यं आयुःकामार्थसिद्धये ॥ १ ॥ प्रथमं वक्रतुंडं च एकदंतं
तयिकं ॥ तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकं ॥ २ ॥

लंबोदरं पंचमं च षष्ठं विकटमेव च ॥ सप्तमं विघ्नराजेंद्रं धूम्रवर्णं तथाष्टमं ॥ ३ ॥ नवमं भालचंद्रं च दशमंतु विनायकं ॥ एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननं ॥ द्वादशैतानि नामानि त्रिसंध्यायां पठेन्नरः ॥ ४ ॥ न च विघ्नभयं तस्य रोगदारिद्र्यपीडनं ॥ विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनं ॥ पुत्रार्थी लभते पुत्रं मोक्षार्थी लभते गतिं ॥ जपे-द्गणपतेस्तोत्रं षड्भिर्मासैः फलं लभेत् ॥ संवत्सरेण लभते नात्र संशयः ॥ इति व्यासविरचितं गणेशस्तोत्रं संपूर्णं ॥

## गणपतीचे नमस्कार.

गणाधीश तूं मोरया राजसा रे ॥ धरी तूं करीं दीन यां पाडसा रे ॥ किती वीनवूं शंभुपुत्रा दयाळा ॥ नमस्कार माझा तुला दीनपाळा ॥ १ ॥ करेचें तिरीं नांदसी मोर-गांवीं ॥ तिथे दिव्य शोभा तुझी तीं पहावी ॥ असें वाटतें वाहवें चंदनाला ॥ नमस्कार० ॥ २ ॥ जना देसि रे चां-गली नित्य बुद्धी ॥ तुझ्या पासुनी होतसे सर्व सिद्धी ॥ बहु शांतता देसि तूं वा मनाला ॥ नमस्कार० ॥ ३ ॥ मला चैन नाहीं सदोदीत देवा ॥ ह्मणोनी घडेना तुझी नित्य सेवा ॥ अतां तूं च देई विसांवा जिवाला ॥ नम० ४ तुझी माउली पार्वती आदिमाता ॥ मनीं ती सुखावे तु-झाला पहातां ॥ अती सौख्य देसी प्रभो तूं शिवाला ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ तुला शोभतें वस्त्र पीतांबराचें ॥ कसे मोकळें शेंदुरीया झग्याचें ॥ असें पाहुनी शांति वाटे

मनाला ॥ नमस्कार० ॥ ६ ॥ गजासूरें माजला दैत्य रानीं ॥ वधोनी तया ख्याति केली पुराणीं ॥ वरा देवुनी त्वां तया पूज्य केला ॥ नमस्कार० ॥ ७ ॥ तुझी सर्व लीला गणेशा पुराणीं ॥ तुला वर्णितां शीणली शेषवाणी ॥ तिथें काय मी वर्णु तूझ्या यशाला ॥ नमस्कार० ॥ ८ ॥ नमोनी अतां शारदा आदि माता ॥ अपेक्षीत मी मागतों एक आतां ॥ सदा दे सुबुद्धी जनीं बालकाला ॥ नमस्कार माझा तया शारदेला ॥ ९ ॥ तुझें रूप पाहोनियां मोर नाचे ॥ तुझ्या कारणीं चित्त हो मोरयाचें ॥ तदा तुष्ट केलेंसि त्या गणपतीला ॥ नमस्कार० ॥ १० ॥ तुझा तात ब्रह्माभिधानी पवित्र ॥ तया विष्णुनें दीधलें ब्रह्म- ‑ ॥ तुझें रूप पाहोनियां भ्रांत झाला ॥ नम० ॥ ११ ॥ विणा वाद्य वाजे तुझे नृत्यकाळीं ॥ करोनी कृपा संकटे सर्व टाळी ॥ संतुष्ट केलें स्वयें अंबिकेला ॥ नमस्कार० ॥ १२ कृपेनें तुझ्या रंक होईल राणा ॥ मुका तोहि वाचील माहा पुराणा ॥ गिरोलंघना येतसे पांगुळाला ॥ नम० १३ नसे आस आतां मला अन्य कांहीं ॥ असो रामचंद्रीं सदा सन्मतीहि ॥ वरा दे अशा ज्ञान देवोनि बाला ॥ नम० १४

## ॥ कामदावृत्त ॥

गौरिनंदना विघ्ननाशना ॥ तोषवी जना आणि मन्मना ॥
वर्णु मी किती सांग त्वद्गुणा ॥ तारिरे मला मोदकाशना ॥

## ॥ श्लोक ॥

## गुरूचें ध्यान.

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ॥ द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्वमस्यादि लक्ष्यं ॥ एकं नित्यं विमलमचलं सर्वदा साक्षिभूतं ॥ भवातीतंत्रिगुणरहीतं ॥ सद्गुरुं तं नमामि ॥

## ओंवी.

गणेश शारदा सद्गुरू संत साधू कुळेश्वरू ॥
सर्वही माझा रघुविरू । सद्गुरु रूपें ॥

## ॥ गुरूचे नमस्कार ॥

प्रपंचीं सदा गुंतलें चित्त माझें ॥ कधीं आठवेना मला ध्यान तूझें ॥ वृथा काळ गेला करूं काय हो मी ॥ नमस्कार माझा गुरूराज स्वामी ॥ १ ॥ कधीं भेट होईल ती हो कळेना ॥ कधीं पालटे कर्मरेषा टळेना ॥ अहा शीणलें व्यर्थ राहोनि धामीं ॥ नमस्कार० ॥ २ ॥ अनुष्ठान निष्ठा अशा साधनाची ॥ जरी कामना पूर्ण होई मनाची ॥ नको साधनें मी न जाणेंच कांहीं ॥ नमस्कार माझा गुरूराज पायीं ॥ ३ ॥ बहू पुण्ययोगें तुझी भेट झाली ॥ म्हणोनी जनीं मन्मती पात्र झाली ॥ रघूराज पायीं सदा शांत कामीं ॥ नमस्कार० ॥ ४ ॥ नमस्कार आधीं

कवणा करावा ॥ गुरू थोर कीं देव थोर ह्मणावा ॥ मला वाटतें सद्गुरू थोर आहे ॥ तयाचे प्रसादे जगीं धन्यताहे॥ ५

---

महाक्षेत्र कोल्हापुरीं वास ज्याचा ॥ महायोगि या योग तो पूर्ण त्याचा ॥ ह्मणोनी तया बोलती योगिराजा ॥ नमस्कार माझा गुरू कृष्णराजा ॥ १ ॥ नमो पंचगंगा नदीतीरवासी ॥ सदा शांत जो मोद देई जनासी ॥ जया चिंतितां येतसे सर्व काजा ॥ नमस्कार० ॥ २ ॥ जया वर्णितां सिद्धि होतील दासी॥ वसोनी गृहीं रावती निश्चयेसी ॥ सदा पत्रपुष्पें करी सांग पूजा ॥ नमस्कार० ॥ ३ अशा सद्गुरूला मनीं आठवीतां ॥ सुखाचीच प्राप्ती मुखीं गूण गातां ॥ करी आत्म ऐक्यीं परीपूर्ण पूजा ॥ नम० ४ मनीं वास ज्याचा मनीं ध्यास त्याचा ॥ अशा सद्गुरूतें स्मरे नित्यवाचा ॥ गृहीं आणुनी पूजितो संत फौजा ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ बहू क्लेश झाले किती दुःख साहूं ॥ गुरू वाचुनी मी असे काय राहूं ॥ अतां तूंच देई विसावा जिवाला ॥ नमस्कार माझा गुरू कृष्णजीला ॥ ६ ॥ कुटुंबांत जी प्रीय होती जिवाची ॥ तिही फीरली रुष्ट झाली मनाची ॥ नसे थार कोठें बसाया मनाला ॥ नमस्कार० ॥ ७ ॥ तुला प्रार्थितोरे नको दुःख देऊं ॥ मला वाटतें नित्य देवास गाऊं ॥ प्रभूचीच सेवा घडो मन्मतीला ॥ नमस्कार० ॥८॥ असें दैव माझें कसें हीन झाले॥ ह्मणूनीच देवा मला मोकलीलें ॥ किती कर्म खोटें टळेना

## ॥ श्लोक ॥

### गुरूचें ध्यान.

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ॥ द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्वमस्यादि लक्ष्यं ॥ एकं नित्यं विमलमचलं सर्वदा साक्षिभूतं ॥ भवातीतंत्रिगुणरहीतं ॥ सद्गुरुं तं नमामि ॥

### ओंवी.

गणेश शारदा सद्गुरू संत साधू कुळेश्वरू ॥
सर्वही माझा रघुविरू । सद्गुरू रूपें ॥

### ॥ गुरूचे नमस्कार ॥

प्रपंचीं सदा गुंतलें चित्त माझें ॥ कधीं आठवेना मला ध्यान तूझें ॥ वृथा काळ गेला करूं काय हो मी ॥ नमस्कार माझा गुरूराज स्वामी ॥ १ ॥ कधीं भेट होईल ती हो कळेना ॥ कधीं पालटे कर्मरेषा टळेना ॥ अहा शीणलें व्यर्थ राहोनि धामीं ॥ नमस्कार० ॥ २ ॥ अनुष्ठान निष्ठा अशा साधनाची ॥ जरी कामना पूर्ण होई मनाची ॥ नको साधनें मी न जाणेंच कांहीं ॥ नमस्कार माझा गुरूराज पायीं ॥ ३ ॥ बहू पुण्ययोगें तुझी भेट झाली ॥ म्हणोनी जनीं मन्मती पात्र झाली ॥ रघूराज पायीं सदा शांत कामीं ॥ नमस्कार० ॥ ४ ॥ नमस्कार आधीं

कवणा करावा ॥ गुरू थोर कीं देव थोर ह्मणाश ॥ मला वाटतें सद्गुरू थोर आहे ॥ तयाचे प्रसादे जगीं धन्यताहे॥ ५

---

महाक्षेत्र कोल्हापुरीं वास ज्याचा ॥ महायोगि या योग तो पूर्ण त्याचा ॥ ह्मणोनी तया बोलती योगिराजा ॥ नमस्कार माझा गुरू कृष्णराजा ॥ १ ॥ नमो पंचगंगा नदीतीरवासी ॥ सदा शांत जो मोद देई जनासी ॥ जया चिंतितां येतसे सर्व काजा ॥ नमस्कार० ॥ २ ॥ जया वर्णितां सिद्धि होतील दासी ॥ वसोनी गृहीं राबती निश्च-येसी ॥ सदा पत्रपुष्पें करी सांग पूजा ॥ नमस्कार० ॥ ३ अशा सद्गुरूला मनीं आठवीतां ॥ सुखाचीच प्राप्ती मुखीं गूण गातां ॥ करी आत्म ऐक्यीं परीपूर्ण पूजा ॥ नम० ४ मनीं वास ज्याचा मनीं ध्यास त्याचा ॥ अशा सद्गुरूतें स्मरे नित्यवाचा ॥ गृहीं आणुनी पूजितो संत फौजा ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ बहू क्लेश झाले किती दुःख साहूं ॥ गुरू वाचुनी मी असे काय राहूं ॥ अतां तूंच देई विसावा जिवाला ॥ नमस्कार माझा गुरू कृष्णजीला ॥ ६ ॥ कुटुंबांत जी प्रीय होती जिवाची ॥ तिही फीरली रुष्ट झाली मनाची ॥ नसे थार कोठें वसाया मनाला ॥ नम-स्कार० ॥ ७ ॥ तुला प्रार्थितोरे नको दुःख देऊं ॥ मला वाटतें नित्य देवास गाऊं ॥ प्रभूचीच सेवा घडो मन्म-तीला ॥ नमस्कार० ॥८॥ असें दैव माझें कसें हीन झाले॥ ह्मणूनीच देवा मला मोकलीलें ॥ किती कर्म खोटें टळेना

हरीला ॥ नमस्कार० ॥ ९ ॥ दयासागरा ब्रह्मरूपा दयाळा ॥ मला भेट देई गुरू तूं कृपाळा ॥ तयाचे प्रसादें मला बोध झाला ॥ नमस्कार० ॥ १० ॥ भवाब्धीमधें दुःख हें केवि साहूं ॥ गुरूपासुनी मोक्ष मागून घेऊं ॥ हृदीं राहुनि मन्मना बोध केला ॥ नमस्कार० ॥ ११ ॥ मना प्रार्थनारे तुला एक आहे ॥ गुरूराज माझा सदोदीत पाहे ॥ नको कष्ट भोगूं पहा व्यर्थ वाया ॥ नमस्कार माझा तुह्मां कृष्णराया ॥ १२ ॥ मनां रे जपावी गुरूमंत्र माळा ॥ सदानंद पावे महादेव भोळा ॥ लक्ष्मी नमीते गुरूराज पाया ॥ नमस्कार माझा गुरू कृष्णराया ॥ १३ ॥

## ॥ गुरू पादुकेस प्रार्थना ॥

जयाचे प्रसादे निजानंद झाला ॥ देहें तयाचा जडभार गेला ॥ श्रीराम ऐसा मज बोध केला ॥ विसरूं कसा मी गुरूपादुकेला ॥ १ ॥ स्वरूप माझें मज दाखवीलें ॥ सोहं प्रकाशें मज भीववीलें ॥ आभाव माझा परीपूर्ण झाला ॥ विसरूं कसा० ॥ २ ॥ आत्माच माझा मज दाखवीला ॥ जिवा शिवा भाव विरोन गेला ॥ भावे अभावें विरहीत झाला ॥ विसरूं कसा० ॥ ३ ॥ अखंड माझें हृदयांत आहे ॥ स्वरूप दृष्टी परीपूर्ण पाहे ॥ सांडून मातें दुर नाहिं गेला ॥ विसरूं कसा० ॥ ४ ॥ जयाचे प्रसादे मती शुद्ध झाली ॥ सप्रेम योगें मती हर्षवीली संसार ज्यानें वहु लांव केला ॥ विसरूं कसा० ॥ ५ ॥

ज्या संगतीनें मना बोध झाला ॥ मनोदरीचा जड भास नेला ॥ साक्षात्परात्मा मज भेटवीला ॥ विसरूं० ॥ ६ ॥
सद्योग पंथे घरीं आणियेलें ॥ उगीच मातें परब्रह्म केलें ॥ प्रचंड तो बोध रवी उदेला ॥ विसरूं कसा० ॥ ७ ॥
चराचरीं व्यापकता जयाची ॥ अखंड भेटी मजला तयाची परंपदी संगम पूर्ण झाला ॥ विसरूं कसा० ॥ ८ ॥ जो सर्वदा गुप्त जनांत वागे ॥ प्रपन्न भक्ता निज बोध सांगे ॥ सद्भक्ति भावाकरितां भुकेला ॥ विसरूं कसा० ॥ ९ ॥
अनंत माझे अपराध कोटी ॥ नाणी मनीं घालुनि सर्व पोटीं ॥ बोधा करोनी श्रम फार झाला ॥ विसरूं० ॥१०
कांहीं मला सेवनही न झालें ॥ तथापि तेणें मज तारियेलें ॥ आतां तरी अर्पिन प्राण त्याला ॥ विस० ॥ ११॥
माझा अहंभाव असे शरिरीं ॥ तथापि तो सद्गुरु अंगिकारी ॥ नाहीं मनीं अल्प विकार झाला ॥ विस० ॥ १२
आतां कसा मी उपकार फेडूं ॥ हा देह ओवाळुनि दूर सोडूं ॥ म्यां एक भावें प्रणिपात केला ॥ विस० ॥ १३॥
जया वाणितां वाणितां वेदवाणी ॥ म्हणे नेति नेति इति ज्या पुराणीं ॥ नव्हे अंत ना पार ज्याच्या रुपाला ॥ विस० ॥ १४ ॥ जो साधुचा जीव अंकीत झाला ॥ त्याचा असे भार नीरंजनाला ॥ नारायणाचा भ्रम दूर केला ॥ विस० ॥ १५ ॥

---

## रामदासाचे नमस्कार.

शुकासारिखें पुर्ण वैराग्य ज्याचें ॥ वशिष्टापरी ज्ञान योगे श्वराचे ॥ कवी वाल्मीकासारिखा पूर्ण ऐसा ॥ नमस्कार माझा अशा रामदासा ॥ १ ॥ नमस्कार माझा महिज्या वरातें ॥ स्वयें देह धारी जनीं उद्धराते ॥ विवेकेंचि तोडोनियां मोह फासा ॥ नमस्कार माझा अशा रामदासा ॥ २ ॥

## शार्दुल० श्लोक.

वस्त्रें हूरमुजीच पट्कुरि तसा माथा चिराऊ असे ॥ काया सुंदर गौरवर्ण विलसे भाळीं आवाकु असे॥याची सत्कविता समग्र अवघी कल्याण लिहीतसे ॥ ऐसा ज़ो जगतीं अनंत कविचा पाणी शिरीं वीलसे ॥ १ ॥

## श्लोक.

भव्य रूप अति सुंदर दिक्षा ॥ राम नाम स्मरणें करि भिक्षा ॥ वृत्ति होइल उदासिन जेव्हां ॥ रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ २ ॥ नित्य नेम बरवा जगि ज्याचा ॥ अनुदिनीं हरिचिया स्मरणाचा ॥ गुरु पदीं असा ठर जेव्हां ॥ रामदास म्हणणे० ॥ ३ ॥ नाठवे पुत्र तनु लय जाया ॥ मृगजळा परिस मानित काया ॥ पर वधू जननी सम जेव्हां ॥ रामदास ह्मणणे मग० ॥ ४ ॥

अनुष्टुप्.

मायातीतायनित्याय माया गुणनिवासिने ॥ व्यक्ताव्यक्त स्वरूपाय रामदासायतेनमः ॥

## रामदासाचें अष्टक.

गुरू राजया ब्रह्म रूपा दयाळा ॥ दया सागरा पाव वेगें कृपाळा ॥ अनाथा दिना कारणें तूं कुवासा ॥ महाराजया श्री गुरू रामदासा ॥ १ ॥ तुझें रूप पाहावया आस मोठी ॥ तरीं दाखवी रूप तत्काळ दृष्टी ॥ जसी बाळका माय तूं धांव तसा ॥ महाराजया श्री गुरू राम दासा ॥ २ ॥ मना इंद्रिया काम क्रोधासि मारी ॥ मदें मत्सरें चालनाहीं निवारी ॥ जळा वेगळा तळमळे मीन जैसा ॥ महाराज या श्रीगुरु रामदासा ॥ ३ ॥ नसे सूख संसार हा घोर मोठा ॥ जसा सिंह हस्तीस मारी चपेटा ॥ अशा संकटीं सोडवी राजहंसा ॥ महाराज या श्री० ॥४॥ नको अंत पाहूं च माया हरावी ॥ तुझी भक्ति वैराग्यता शांति द्यावी ॥ सदा अंतरीं देइ सद्बोध खासा ॥ महाराज या श्री० ॥ ५ ॥ तुझे ब्रीद सत्यत्व वाटे खरेरे ॥ प्रचीती मला दाखवी सत्वरीरे ॥ पतीतास आहेसि आधार जैसा ॥ महाराज या श्री० ॥ ६ ॥ मला वाटतें अंतरीं त्वां वसावें ॥ तुझे दास बोधासी त्वां बोधवावें ॥ अगस्त्यापरी पाववी सोड रोषा ॥ महाराज या श्री० ॥ ७ ॥

म्हणे दास दासास हातीं धरावें ॥ सदा सर्वदा अंतरीं

प्रेम द्यावें ॥ उपेक्षूं नको स्वामि दासासि हंसा ॥ महा-
राज या श्री० ॥ ८ ॥

## अष्टक दुसरें.

परंब्रह्म चिद्रूप व्यक्तीस आलें ॥ समर्थ स्वरूपींच निख्यात झालें ॥ परब्रह्म प्रत्यक्ष या लोक भावें ॥ नमो सद्गुरू रामदासासि भावें ॥ १ ॥ पराकाश सारांश घेऊन वेगें ॥ जना पावले द्यावया अंतरंगें ॥ सदा उन्मनीं मंदने मी स्वभावें ॥ नमो स० ॥ २ ॥ तपस्वी तनू तेज वैराग्य लीला ॥ कळे आकळे चित्कळेचा जिव्हाळा ॥ उदासीन वृत्तीं अरण्यीं वसावें ॥ नमो स० ॥ ३ ॥ क्षणामाजि काया रूपें पालटावें ॥ अकस्मात त्या भाविका भेट द्यावें ॥ महत् भूत संचार अदृश्य व्हावें ॥ नमो स० ॥ ४ ॥ उडी घातली ते नदीचे प्रवाहीं ॥ बुडाली तनूची जया शुद्धि नाहीं ॥ किती काकळीनें प्रवर्तीस यावें ॥ नमो स. ॥ ५ ॥ धनुर्बाणपाणी सुशोभित संगें ॥ वसावें पुजावें स्वहस्तासुरंगें ॥ वनीं वानरें क्रीडती तेथ जावें ॥ नमो सद्गुरु० ॥ ६ ॥ युगांतील हा राम आला कलीला ॥ जना भासतो दाखवी दिव्य लीला ॥ जनादर्शनें पाय व्यक्तीस यावें ॥ नमो स. ॥ ७ ॥ मोहोछाव जो चाफळीं नित्य नेमी ॥ भरे विश्व यात्रा महा रामनवमी ॥ मनानें सदा कीर्तनीं दंग व्हावें ॥ नमो स. ॥ ८ ॥ हरी निश्चयें घोर संसार वैरी ॥ समर्था तुझे दास नानाधिकारी ॥ विरक्तीस भक्तीस मेरू करावें ॥ नमो स. ॥ ९ ॥

## श्लोक.

हरेर्नामैव नामैव नामैव ममजीवनं ॥ कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गान्यथागुर्ती॥१॥यत्रयत्र रघुनाथ कीर्तनं॥ तत्रतत्र कृत मस्तकांजलिः॥ बाष्पवारि परि पूर्ण लोचनं॥ मारुतीं भगत रावणांतकं ॥ २ ॥ तत्रैव गंगा यमुना त्रिवेणी ॥ गोदावरी सिंधु सरस्वतीच ॥ सर्वाणि तीर्थानि वसंति तत्र यत्राच्युतो दारकथा प्रसंगः॥ ३ ॥ आळंकापुरीं पुण्यग्रामीं पवित्र ॥ तेथें नांदतो ज्ञानराजा सुपात्र ॥ तया आठवीतां सदाल्हादचित्ता ॥ नमस्कार माझा तया ज्ञाननाथा ॥ ४ ॥ नदी दिव्य गोदातटीचा निवाशी ॥ सदा प्रीय जो सज्जना वैष्णवासी ॥ जया आठवीता सदाल्हाद चित्ता ॥ नमस्कार माझा तया एकनाथा ॥ ५ ॥ महाक्षेत्र हे पंढरी क्षेत्र जाणा ॥ हरी कीर्तनें गर्जती भक्त नाना ॥ जयाची असे आवडी देव देवा ॥ नमस्कार माझा तया नामदेवा ॥ ६ ॥ पुराणीं बहू वर्णिले साधुसंत ॥ प्रस्तूत जे वर्तती या कलीत ॥ पुढेंही पुढें गाति जे पांडुरंगा ॥ नमस्कार माझा तयालागि सांगा ॥ ७ ॥ दयासागरा येशवंता किती हा ॥ साहा शत्रुना त्याग केला खरा हो ॥ ह्मणोनीच आला हरीच्या पदाला ॥ तरी नित्य आम्ही स्मरू पावलाला ॥ ८ ॥ महाराजया येशवंता दयाळा ॥ दयासागरा पाव वेगें कृपाळा ॥ अती भक्ति भावें प्रभू तोषवीला ॥ ह्मणोनीच आम्ही स्मरू पावलाला ॥ ९ ॥

असे साऊळी मूर्ति ती ज्ञानरूपी ॥ जना भेट देई त्वरे शांत रूपी ॥ जसी साऊली तोषवी बालकाला ह्मणोनीच आह्मी स्मरू पावलाला ॥ १० ॥

## ॥ चाल कटाव. ॥

संत माळिका प्रारंभ ॥ हरिजनहो हरिगुरू स्मरणीं जन तारुनि आपणहि तरले। निज भक्त सुखें अवतरले ॥ ध्रु ॥ तारक मार्ग दाविति लोकां बोधें हरती भेद भयशंका जे संसार सागरिं नौका नामें त्यांचीं पावन ऐका ब्रह्मा शंभू कुबेर प्रभंजन इंद्र चंद्र यमभास्कर पावक वाक्पतिव-रुण वशिष्ट पाराशर वाल्मीक महा कवि गौतम विश्वा-मित्र अगस्ती भार्गव ऋषभदेव सनकादिक नारद तुंबर कपिल दालभ्य कश्यप अस्तिक शुक वामदेव श्रुतदेव शमिक जडभर्त दत्त ऋषिजावालिक भृगुजैमिनिउपमन्यु कर्दम पुंडरीक मुद्गल कविहरि अंतरिक्ष पिप्पलायन अविर्होत्र चमसकरभाजन द्रुमील अत्री मैत्रि पौल-स्ति शौनक ब्रम्हदेव कश्यप मार्कंडेय असित देवल दूर्वास देव द्विज सुदेव संजय वैशंपायन हरिश्चंद्र इक्ष्वाकू ऐळा नळ कुदालन चंद्रहास्य मुचकुंदमनू ध्रुव रुक्मांगद अवसद प्रिय लक्ष्मण गुहकभरथ शत्रूघ्न सु-ग्रिव वाळिविभीषण जांबुवंत हनुमंत सुदामा जनक बळी प्रल्हाद अजामिळ गणिका गरूड गजेंद्रापिंगळा विदूरगंगा सूत अर्जुन धर्म भीम सहदेव सुभद्रा नकूळ प्रभू गोपाळ

गोपिका उद्धवयदु अक्रूर परीक्षिति शेषश्रियाळ जटायू जानाकि शर्वांगो शबरी अनुसुया सरस्वाति भागीरथि यमुना मैत्रजा कमळजा अहिल्या अरुंधति संध्यावाळिमिति जरा देवहुति पांचावाळि रुक्मिणी राधा ऋषिपत्न्या॰चंद्रावाळि उग्रसेन वसुदेव देवकी कुब्जानंद यशोदा ॥ १ ॥ हरि जन हे हरि गुरु स्मरणीं जन तारूनि आपणहि तरले निजभक्त सुखं अवतरले ॥ ध्रु ॥ झाले नित्य मुक्त निजज्ञान धाले बोध सुधारस पान त्यजिले काम क्रोध अभिमान त्यांचे परिसावें अभिधान श्रीमत्शंकराचार्य जगद्गुरु भाष्यकार श्रीधर मधुसूदन हस्तामलक कश्यप जैत्रपाळ जोतिशतानंद माछिंद्र मीन गोरक्ष भर्तृहरि सदानंद गहिनी चवरंगी परमहंस कृष्णद्वैपायन कृष्ण महामुद्गल नारायण श्रीनिवास जयदेव निवृत्ती ज्ञानदेव सोपान चांगया मुक्ताइरेवणासिद्धेश्वर मरळसिद्ध जालंधर अच्युत दामोदर सारंग सरस्वती नारसिंह वढवाळ सिद्धेश्वर संतदास नवलक्ष सालया निपट चर्पट बोधला विक्रम गोपिचंद कानियां मुक्ता मैनावति मृत्युंजय मालिनरहरी विश्वेश्वरव्यंका विसोबाखेचर नामदेव हरिदेव नारायण मादां गोंदा भागवत पद्धरसा कानोफाटक नामाशिलारी गार गोविंदा सांवता चोखा मेळा पिसाभैरा नरसींहमहंता जनमित्र पुरंधर विठ्ठल गोरा कुळालसेना कुर्मदास हरिदास कालिकादास रोहीदास त्रिलोचन द्वीज नरहरि सो-

नार लतिपा धनाशेट हरि वल्लभदामा रामानंद उदासी नानक सजानंद कबीर कमाल किशोर सखया सूरदास यशवंत मधुया पिपाजी सजणा रामदास बिबाजी शाहू हूसेन शमनाजी माधव माखनचिद्घन परमानंद मदलसा कानोपात्रा मिरा कृष्णाराई जनि वहिणी करमाइ हरिजनहो० ॥ २ ॥ कोणी ब्रम्हनिष्ट गुरु भजनीं योगी इतरागीरत सगुणीं भाविक नामा किर्तन मौनी सज्जन श्रवण करावें श्रवणीं तुळसीदास कनकदास अज्ञान सिद्ध नागेश रेणुकानंदन मैनि भानुदास विरविख्यात जनार्दन एकभक्तनाथ गुरुभक्त रामया पुरुषोत्तम लीला विश्वंभर चिंतामणी मुक्तेश्वर मुद्गल कृष्णदास अवधूत दिगांबर माणिकनाथ दासोपंत रमावल्लभ लोलिंबराज संतदास मोरया कृष्णादास मार्तंड योगिया कृष्णदास जयराम तुकोबा रघुनाथस्वामी आनंदमूर्ति मल्हारी पूर्ण शिवराम रघुपति शेष निरंजन केशव विश्वनाथ कवि रंगनाथ कल्याण चंद्रसुखी मानपुरी रुक्मणाचिद्घन रामकृष्ण वासुदेव तुकया बंधुकुमर नारायण मध्वमुनेश्वर निपट निरंजन पंढरिचा प्रल्हाद साधु जयराम केशव गोसावी नंदन हरिनारायण राघवचिद्घन श्रीधर गुरुगोपाळ महंत ऐसे संत बहु किती गुप्त प्रगट जडमूढ पिशाच्च वलोन्मत्त विदेही नलकुशवर्ण नरहरीभक्त चतुर्विध मुक्त विरक्त उपासक झाले भगवंतीं तत्पर जाति विजाति ह्मणोचि नये मग पावन सुकीर्ति विकृति गुण गातसे जयराम सुताचीं

वाणी ॥ ३ ॥ हरी जनहो हरिगुण भजनीं जन तारूनी आपणहि तरले निजभक्त सुखें अवतरले ॥ ६ ॥

## ॥ श्री दत्तात्रयाचे श्लोक. ॥

दत्तात्रयो हरीः कृष्ण उन्मादीनंददायकः ॥ मुनिर्दिगंबरो-बालः पिशाचो ज्ञानसागरः ॥ १ ॥ एतानि दशनामानि सार्व काळे सदा पठेत् ॥ मनसा चिंतितं कार्यं सिद्धं भवति नान्यथा ॥ २ ॥ अत्रिपुत्रो माहातेजा दत्तात्रेयो महा-मुनिः ॥ तस्य स्मरण मात्रेण सर्व पापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥ सदा प्रार्थितो कीगुरूच्या पदांसी ॥ धरीतों शिरीं वंदितों आदरेंसी ॥ धरूनी करीं तारिया बाळकासी ॥ नमस्कार माझा दत्तात्रयाच्या. पदांसी ॥ ४ ॥ मतीहीनमीदीन आहे खराहो ॥ परी दास तूझा करी वाखराहो ॥ जसें लेंकरूं पाळिते माय्र कूशीं ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ लडी-वाळ मीं बाळ अज्ञान तूझा ॥ गुरू वांचुनी पांग फेडील माझा ॥ दुजा कोण तूझ्याविणेंहो अम्हासी ॥ नम-स्कार० ॥ ६ ॥ आई बाप बंधु सखा तूंची देवा ॥ तसे इष्टमित्रादिक व्यर्थ हेवा ॥ कळोनी असे सर्व भ्रांती अम्हासी ॥ नमस्कार० ॥ ७ ॥ गुरूची चरित्रें करी नित्य पाठ ॥ तया पावतो देवतो एकनिष्ठ ॥ तयाचे कुळें दीप सज्ञान राशी ॥ नमस्कार० ॥ ८ ॥ देवोनि राज्यां रज-काशि केला ॥ या श्रेष्ठ लोकीं हरिले खळाला ॥ तैशा परी पालक तूं अम्हासी ॥ नमस्का० ॥ औदुंबरा सन्निध सर्वकाळ ॥ जनीं वनीं क्रीडत नित्यकाळ ॥ गुरू नास

कैवल्य सद्गूणराशी ॥ नमस्का० ॥ सती कार्दमी सत्वधी आदिमाता ॥ त्रिकाल ध्यानीं मनीं नित्य गातां ॥ हरे रोग व्याधी दरिद्रासि नासी ॥ नमस्का० ॥ करोनी मनीं निश्चय अष्टकाचा ॥ करा हो जनीं पाठ दत्तात्रयाचा ॥ असे प्रार्थिते दत्त दासानुदासी ॥ नमस्का० ॥ १२ ॥

## श्रीदत्तात्रयाचें अष्टक.

### शार्दुलविक्रीडित.

मातेच्या उदरांत मास नव हे होतो तधीं अग्निनें ॥
उष्मा होउनि जंतुदोषहि तया स्थानांत दुर्गंधिनें ॥
मातेच्या विविधान्न भक्षणरसें केलें बहू घावरें ॥
हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ १ ॥
येतां बाहिर सौख्य दुःख नकळे बोलावया येइना ॥
देती औषध जे जयासि रुचलें ते नेणती भावना ॥
किरकिर मी करितांच मारिति करें येऊनिया कोणरें ॥
हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ २ ॥
किंचित्ज्ञान असे तधीं मज बहू खेळावयाची सवे ॥
खोड्याही करणें परासि पिडणे हें आवडे आठवे ॥
होती लोक समस्त तात जननी कोपें जसें दावरे ॥
हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ ३ ॥
आलें यौवन तों मदांध बनलो विद्याधनांच्या बळें ॥
योषा लंपट होउनि पितृगुरु ज्ञातेहि धिक्कारिले ॥
होय स्त्री अवलोकितांच मदनें माचित्त हें बावरें ॥

हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ ४ ॥
रोगें ग्रासियलें उपाय नचले या औषधानें कधीं ॥
प्रातःस्नानाहि ब्रह्मकर्म न घडे शक्ती नसे विग्रहीं ॥
चिंता शोक भरें निरंतर मुखीं नाहीं तुझें नावरे ॥
हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ ५ ॥
वृद्धत्वीं पुत्रकंन्या दिलिस गुरुवरा वांझ नारीस देवा ॥
वृद्धा तैसीच वंध्या महिषि दुभऊनी देउनी द्रव्यठेवा ॥
छेदूनी घेवड्याचा तरुधन बहु दे त्या विप्रराया बरे ॥
हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ ६ ॥
दीनाधीश म्हणोनि मानिति तुला वेदांत शास्त्रज्ञही ॥
भक्ताभीष्ट सदा प्रपूर्ण करिसी दृष्टांतका प्रत्यहीं ॥
भृत्या किंचित दुःख पाहुनि त्वरें वेसी सख्या धावरे ॥
हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ ७ ॥
भीमात्मज तनयासि संस्कृति भवें दुःखें बहू ग्रासिलें ॥
हें दत्ता अथवा मनीं जरी असे हें पाहिजे भोगिलें ॥
भोगाया मनिं धैर्य देउनि पदीं देई तुझ्या ठावरे ॥
हे दत्तात्रय फार दुःख मजला झालें अतां पावरे ॥ ८ ॥
इति भीमात्मजकृत दत्तात्रय स्तुती संपूर्णमस्तु

## पादुकास्तुतिस्तोत्र.

### ॥ चामरवृत्त ॥

इंदुकोटि तेजकीर्ण सिंधुभक्तवत्सलं ॥ नंदनात्रिसूनुदत्त-
मिंदिराक्ष श्रीगुरुं ॥ गंधमाल्यअक्षतादि वृंददेव वंदितं ॥

वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहिमां ॥ १ ॥ मोहपाश अंधकार जात दूर भास्करं ॥ आयताक्ष पाहि श्रीयवल्लभेशनायकं ॥ सेव्य भक्तवृंदवरद भूयोभूयोनमाम्यहं ॥ वंदयामि० ॥ २ ॥ चित्तजादि वर्गसिद्धमंत्रतारणांकुशं ॥ तत्वसारशोभितात्मदत्तश्रीयवल्लभं॥उत्तमावतारभूतकर्तृभक्तवत्सलं ॥ वंदयामि० ॥ ३ ॥

व्योमभूमि आपवायुतेजकर्तुमीश्वरं ॥ कामक्रोधमोहराहितसोमसूर्यलोचनं ॥ कामितार्थ दातृभक्त कामधेनु श्रीगुरूं ॥ वंदयामि० ॥ ४ ॥ पुंडरीक आयताक्षि कुंडलेंदु तेजसं ॥ चंद्रदुरित खंडणार्थ दंडधारि श्रीगुरुं ॥ मंडलीक मौलिमार्तंड भासिताननं ॥ वंदयामि० ॥ ५ ॥ वेदशास्त्रस्तुस्त्यपादमादिमूर्ति श्रीगुरुं ॥ नामबिंदु कलातीत कश्यपादि सेव्यगं ॥ सेव्य भक्त वृंद वरद भूयो भूयो नमाम्यहं ॥ वंदयामि० ॥ ६ ॥ अष्टयोगतत्वनिष्ठ तुष्टज्ञान वारिधिं ॥ कृष्णवेणितीरवास पंचनदी संगमं ॥ कष्ट दैन्य दूर भक्त तुष्ट काम्यदायकं ॥ वंदयामि० ॥ ७ ॥ नारसिंह सरस्वतीश नाममष्टमौतिकं ॥ हारकृत्यशारदेन गंगाधराख्य आत्मजं ॥ धारणीक देवदीक्ष गुरुमूर्ति तोषितं ॥ परमात्मानंदश्रिया पुत्रपौत्रदायकं ॥ ८ ॥ नारसिंह सरस्वतीश अष्टकंचयः पठेत् ॥ घोरसंसारसिंधु तारणाख्यसाधनं ॥ सारज्ञानदीर्घ आयुरारोग्यादि संपदाम् ॥ चारू वर्ग काम्य लाभ नित्यमेवयः पठेत् ॥ ९ ॥

# ध्यानाष्टक.

## शिखरिणीवृत्त.

अनेका जन्मींचा निजसुकृत ठेवा जरी असे ॥
भवाब्धींच्या ठायीं तर तव पदांभोरुह दिसे ॥
जनोद्धारासाठीं भगवदवतार प्रगटला ॥
दयासिंधू आतां नरहरी गुरो पाव मजला ॥ १ ॥
कुरुंद्वाड ग्रामीं उभय जलगा संगमवनीं ॥
महा सिद्धस्थानीं गहन तप केलें वरमुनीं ॥
जया योगाभ्यासें निजतपनभावें तपविला ॥
दयासिंधू० ॥ २ ॥
पतीताच्या तोंडे करूनि निगमातें पढविलें ॥
महीषीतें वांझे अमृत शिव हस्तें दुभविलें ॥
किडेल्या खांबाचा तरु करुनि तोही फुलविला ॥
दयासिंधु० ॥ ३ ॥
अनुष्टानीं माझें मन वसत नाहीं ह्मणुनियां ॥
नको दुरावूं तूं कठिण पण बाधे त्यजुनिया ॥
न गुंतोंदे कोठें मम शपथ घालीन तुजला ॥
दयासिंधु० ॥ ४ ॥
अकालीं मेघातें मुख पसरितां चातकपणें ॥
न देसि तूं बिंदु त्वरीत मजला जाण मरणे ॥
नुपेक्षीं तूं आतां गगन जलदें तो जिवविला ॥
दयासिंधु० ॥ ५ ॥

निजानुष्ठानाचें तपफळ नमावें त्रिभुवनीं ॥
तदा झाली कैसी अवचित दया ते तुज मनीं ॥
पतीताला पाहूं सकळहि सदात्माचि कळला ॥
दयासिंधु० ॥ ६ ॥
बहू म्यां वर्णावें तरि त्वरित वारे शिणविले ॥
सुरेंद्रा इंद्राला परम गुरुचा पार नकळे ॥
अनेका जिव्हेचा फणिवरही तो तूंचिरविला ॥
दयासिंधु० ॥ ७ ॥
नृसिंह स्वामी हे पठण करितां अष्टक तुझें ॥
तयीं माझें देहीं भव दुरित दावानल विझे ॥
दरिद्रावी वार्ता तडफडुनि गेली रिपुघरा ॥
निजानंदें डोले सुखरुप असे सेवक वरा ॥ ८ ॥

## अथ श्रीगुरुअष्टक प्रारंभः

### मालिनीवृत्त.

सकलभुवनसाक्षी मूर्ति दत्तात्रयाची ॥ प्रकट दिसत लोकीं भट्टजी नाथजीची ॥ ह्रदयकमळि मौनी सर्वदा ध्याति ज्याला ॥ नमन करित त्यांच्या पादपद्मद्वयाला ॥ १ ॥ अगम सकळ वाणी काव्य गद्यें पुराणें ॥ निगम इतिहासा मुख्य ज्याच्या खुणेंनें ॥ वदुनि प्रकट जे का दाविती या जनाला नमन० ॥ २ ॥ अखिल जग ही दोरी सर्प मिथ्यात्व दावी ॥ करुनि प्रतिति तीन्ही ब्रह्म साक्षांत भावीं ॥ विकळ सकल माया सत्य वस्तू जयाला ॥

नमन० ॥ ३ ॥ गृह सुत गृहिणीसीं वर्ततां लोभ नाहीं ॥ सदय त्हृदय मौनी कर्मठी योग्य साही ॥ सुखकर शरणाचा नाथ मौनी अम्हाला ॥ नमन० ॥ ४ ॥ श्रुतिशिर: समवाणी बोध योगासि पाही ॥ असुनि निरभिमानी भक्ति ज्ञानादि कांहीं रघुविर गुरुनाथा वर्णितां हर्ष ज्याला ॥ नमन० ॥ ५ ॥ सुरस रस सुधेच्या सारिखा बोध ज्याच्या ॥ प्रगट श्रवण युग्मीं त्रास नाहीं भवाचा ॥ सकलहिनिजसत्तारूप सर्वत्र ज्याला ॥ नमन० ॥ ६ ॥ श्रुतिगत करि कर्मे कर्मठाहूनि थोरें ॥ फळ रहित करावें बोधवी शिष्य सारे ॥ सफळ विफळ ऐसें जाणुनी स्वस्थ झाला ॥ नमन० ॥ ७ ॥ सकल भुवन मध्यें आत्म सत्ता विराजे ॥ ह्मणउनि ह्मणतां तीं सर्वदा संतराजे ॥ प्रचिति दिधलि कांतालागिं तें तोचि ज्याला ॥ नमन करित त्याच्या पादपद्मद्वयाला ॥ ८ ॥

इति श्रीकांतनाथविरचित श्रीगुरुस्तोत्राष्टकं संपूर्ण ॥
श्रीसच्चिदानंद प्रसन्नोस्तु ॥

## सूर्यस्तुति. व. ति वृत्त.

श्री सविता सूर्यनारायणायनमः ॥ अथ ध्यानं ॥

ध्येयस्सदासवितृमंडल मध्यवर्ती ।
नारायण स्सरसिजासनसन्निविष्टः ॥
केयूरवान्मकरकुंडलवान्किरीटी ।
हारीहिरण्मयवपुर्धृत शंखचक्रः ॥ १ ॥

निजानुष्ठानाचें तपफळ नमावें त्रिभुवनीं ॥
तदा झाली कैसी अवचित दया ते तुज मनीं ॥
पतीताला पाहूं सकळहि सदात्माचि कळला ॥
दयासिंधु० ॥ ६ ॥
बहू म्यां वर्णावें तरि त्वरित बारे शिणविले ॥
सुरेंद्रा इंद्राला परम गुरुचा पार नकळे ॥
अनेका जिव्हेचा फणिवरही तो तूंचिरविला ॥
दयासिंधु० ॥ ७ ॥
नृसिंह स्वामी हे पठण करितां अष्टक तुझें ॥
तयीं माझें देहीं भव दुरित दावानल विझे ॥
दरिद्राची वार्ता तडफडुनि गेली रिपुघरा ॥
निजानंदें डोले सुखरुप असे सेवक वरा ॥ ८ ॥

## अथ श्रीगुरुअष्टक प्रारंभः

### मालिनीवृत्त.

सकलभुवनसाक्षी मूर्ति दत्तात्रयाची ॥ प्रकट दिमत लोकीं भट्टजी नाथजीची ॥ त्हृदयकमळि मौनी सर्वदा ध्याति ज्याला ॥ नमन करित त्यांच्या पादपद्मद्वयाला ॥ १ ॥ अगम सकळ वाणी काव्य गद्यें पुराणें ॥ निगम इतिहासा मुख्य ज्याच्या खुणेंनें ॥ वदुनि प्रकट जे का दाविती या जनाला नमन० ॥ २ ॥ अखिल जग ही दोरी सर्प मिथ्यात्व दावी ॥ करुनि प्रतिति तीन्ही ब्रह्म साक्षांत भावीं ॥ विकल सकल माया सत्य वस्तू जयाला ॥

नमन० ॥ ३ ॥ गृह सुत गृहिणीसीं वर्ततां लोभ नाहीं ॥ सदय त्हृदय मौनी कर्मठीं योग्य साही ॥ सुखकर शरणाचा नाथ मौनी अम्हाला ॥ नमन० ॥ ४ ॥ श्रुतिशिरः समवाणी बोध योगासि पाही ॥ असुनि निरभिमानीं भक्ति ज्ञानादि कांहीं रघुविर गुरुनाथा वर्णितां हर्ष ज्याला ॥ नमन० ॥ ५ ॥ सुरस रस सुधेच्या सारिखा बोध ज्याच्या ॥ प्रगट श्रवण युग्मीं त्रास नाहीं भवाचा ॥ सकलहिनिजसत्तारूप सर्वत्र ज्याला ॥ नमन० ॥ ६ ॥ श्रुतिगत करि कर्मे कर्मठाहूनि थोरें ॥ फळ रहित करावें बोधवी शिष्य सारे ॥ सफळ विफळ ऐसें जाणुनी स्वस्थ झाला ॥ नमन० ॥ ७ ॥ सकल भुवन मध्यें आत्म सत्ता विराजे ॥ ह्मणउनि ह्मणतां तीं सर्वदा संतराजे ॥ प्रचिति दिधलि कांतालागिं तें तोचि ज्याला ॥ नमन करित त्याच्या पादपद्मद्वयाला ॥ ८ ॥

इति श्रीकांतनाथविरचित श्रीगुरुस्तोत्राष्टकं संपूर्ण ॥ श्रीसच्चिदानंद प्रसन्नोस्तु ॥

## सूर्यस्तुति. व. ति वृत्त.

श्री सविता सूर्यनारायणायनमः ॥ अथ ध्यानं ॥


ध्येयस्सदासवितृमंडल मध्यवर्ती ।
नारायण स्सरसिजासनसन्निविष्टः ॥
केयूरवान्मकरकुंडलवान्किरीटी ।
हारीहिरण्मयवपुर्धृत शंखचक्रः ॥ १ ॥

**इति ध्यानं.**——जयाच्या रथा एकचि चक्र पाहीं ॥ नसे भूमि आकाश आधार कांहीं ॥ असे सारथी पांगुळा ज्या रथासी ॥ नमस्कार त्या सूर्यनारायणासी ॥ १ ॥ करीं पद्म माथा किरीटी झळाळी ॥ प्रभा कुंडलांची शरीरा निराळी ॥ पहा राश्मि ज्याची त्रिलोकासि कैसी ॥ नम० ॥ २ ॥ सहस्रद्वयें दोनशे आणि दोन ॥ क्रमी योजनें जो निमिष्यार्धतेन ॥ मना कल्पवेना जयाच्या त्वरेसी ॥ नम० ॥ ३ ॥ विधीवेद कर्मासि आधारकर्ता ॥ स्वधाकार स्वाहादि सर्वत्र भोक्ता ॥ असे अन्नदाता समस्तां जनांसी ॥ नम० ॥ ४ ॥ युगें मंत्र कल्पांत ज्याचे निहोतीं ॥ हरीब्रह्मरुद्रा जया बोलिजेती ॥ क्षयांती महा काळ रूपा प्रकाशी ॥ नम० ॥ ५ ॥ शशितार गोंवूनिया जो ग्रहातें ॥ त्वरें मेरू वेढोनिया पूर्वपंथें ॥ भ्रमें जो सदा लोक रहावयासी ॥ नम० ॥ ६ ॥ समस्तामरामाजि तूं जाण धूर्य ॥ म्हणोनी तूझें नामहो श्रेष्ठ सूर्य ॥ दुजा देव तो दाखवी स्वप्रकाशी ॥ नम० ॥ ७ ॥ महामोह तो अंधकाराशि नाशी ॥ प्रभा शुद्ध सत्वाचि अज्ञान नाशी ॥ अनाथा कृपा जो करी नित्य ऐशी ॥ नम० ॥ ८ ॥ कृपा ज्यावरी होय त्या भास्कराची न पाहूं शके शत्रु त्याला किरींची ॥ उभ्या राहती सिद्धि होवोनी दासी ॥ नम० ॥ ९ ॥ फुलें चंदनें पत्र पुष्पें करोनी ॥ पुजावें वरें एकनिष्ठा धरोनी ॥ मनीं इच्छिलें पाविजेती सुखासी ॥ नम० ॥ १० ॥ नमस्कार साष्टांग बापा स्वभावें ॥ क-

रीनी तया भास्करालागें ध्यावें ॥ दरिद्रें सहस्त्रादि जो
क्लेश नाशी ॥ नम० ॥ ११ ॥ रवी सूर्य आदित्य मित्रादि
भानू ॥ विवस्वान ईत्यादिही पाहरेणू ॥ सदा वांछिती
पूज्य तें शंकरासीं ॥ नम० ॥ १२ ॥ श्री मीत्र रवी सूर्य
भानु खग पुष्प हिरण्य गर्भ ॥ मरीच आदित्य सवित्र
आर्क भास्करो भ्योनमोनमः ॥१३ ॥

---

## ॥ मारुतीचें ध्यान. ॥



मनोजवं मारुततुल्यवेगं ॥ जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठं ॥
वातात्मजं वानरयुथ मुख्यं ॥ श्रीराम दूतं शरणं प्रपद्ये ॥१॥

## ॥ मारूतीचें स्तोत्र प्रारंभ. ॥

श्री अंजनी ऱ्हदयरत्नमरुत्कुमारा ॥ तारावयाभविं जना
वससी उदरा ॥ लावीं सदा मम मन स्वपद स्मराया ॥
साष्टांग तूज नमितों कपियूथराया ॥ १ ॥ बद्धांजलि
स्तविति तूज सुरासुरादि ॥ त्वद्विक्रमा कथिति सांब गदा
धरादि ॥ मी हीन बुद्धि न सुचे स्तुतिही कराया ॥
साष्टांग० ॥ २ ॥ लब्ध प्रकीर्तिवर रामपदाब्ज भृंगा ॥

सिद्धी समग्र तुज वंदिति अंतरंगा ॥ वज्रांग तूं प्रकटसी व्यसनें हराया ॥ साष्टांग० ॥ ३ ॥ भिती पिशाच तव नाम जपें तयातें ॥ देवांसही सूख घडे तव दृष्टिपातें ॥ दासां तुझ्या भ्रम करीन कदापि माया ॥ साष्टांग० ॥४॥ मर्त्यांस तूं भवनिधी परपार नौका ॥ क्षारोधलंघुनि तुवां वश केलि लंका द्रोणाद्रि उद्धरिशिवीरसजीव व्हाया ॥ साष्टांग० ॥ ५ ॥ मारुनि दुष्ट करिशी सुखि रामचंद्रा ॥ सीता समर्पिसि तया सदया समुद्रा ॥ तत्ध्याननिष्ट वससी चिरंजीव काया ॥ साष्टांग० ॥ ६ ॥ रुद्रावतार अवनीवरी तूंचि देवा ॥ मीं लेंकरूं स्तुति करूं कसली सुसेवा ॥ योगीश्वरा प्रकट हो मज उद्धराया ॥ साष्टांग० ॥ ७ ॥ तत्काल दास भयरोग निवृत्ति वर्त्मा ॥ तूं जाणती गुण-निधे सकलांतरात्मा ॥ मीं दीन तूं परम दीन दयालु वर्या ॥ साष्टांग० ॥ ८ ॥ येती अनन्य शरणा प्रति तूज भावें ॥ त्यांच्या अशेष वृजिना हरिसी स्वभावें ॥ हुपकार तूं करिसि दास सुखी कराया ॥ साष्टांग० ॥ ९ ॥ नक्षत्र मंडळंहि छेदुनि उर्ध्व हातें ॥ उड्डाण कार्य गगनीं करिसी अहोते ॥ धांवें महाबलनिधे मम शंकराया ॥ सा० ॥ १० ॥ मत्प्रीति हे तव पदीं चिरकाळ राहो दृष्टीसुधा सम तुझी मज पूर्ण पाहो ॥ नारायणा स्तव तुझा नकळे कराया ॥ साष्टांग तूज नमितों कपियूथराया ॥ ११ ॥

## ॥ भीमाष्टक. ॥

## कामदावृत्त.

सुंदराननाा पिंग लोचना ॥ दुष्ट भंजना विश्व रंजना ॥
भूमि आतमज शोक नाशना ॥ हे दयानिधे वायुनंदना १
लोक वंदना दैत्य कंदना ॥ गूण चंदना वारि बंधना ॥
काम मर्दना तूं जनार्दना ॥ हे दयानिधे० ॥ २ ॥
भक्ति वल्लभा देव दुर्लभा ॥ जीव जीवना चित्त सूलभा ॥
पाव पावना हेच भावना ॥ हे दयानिधे० ॥ ३ ॥
ज्वर नाशना वात नाशना ॥ फल निक्रंतना सीत मर्दना.
राम भेटवी नाम कीर्तना ॥ हे दयानिधे० ॥ ४ ॥
राम चोरिता या महीतळीं ॥ धांवला त्वरें मारुती बळी ॥
सोडवीतसे जगज्जीवना ॥ हे दयानिधे० ॥ ५ ॥
जाहला रणीं स्वामि तूं ऋणीं ॥ द्रोण आणुनी उठविला
फणी ॥ कीर्तिघोष हा ठाऊका जना ॥ हे दया० ॥ ६ ॥
रंगलो मदें काम कर्दमीं ॥ नावडे तुझी भक्ति सत्य मी ॥
चातका परी तूं कृपाघना ॥ हे दयानिधे० ॥ ७ ॥
शीण वाटतो अंतरीं सदा ॥ धांवरे प्रभू वारि आपदा ॥
तप्त मी बहू शांतवी मना ॥ हे दयानिधे० ॥ ८ ॥
सद्गुरू मुखें गूज पुरविले ॥ राघवें तुम्हा जाण निरविलें ॥
साच तूं करी ब्रीद पालना ॥ हे दयानिधे० ॥ ९ ॥
भीम अष्टक वाचिता नरू ॥ भीम दे तया अक्षई वरू ॥
साक्ष बाणली राघवा मना ॥ हे दयानिधे० ॥ १० ॥

अंजनी सुता धांव मारुती ॥ तूंच वा करी शुद्धही मती ॥
कोणरे करी मजासि धावना ॥ हे दयानिधे० ॥ ११ ॥

---

## मारुतीचे नमस्कार.

नव्हे भीम तो मारुति ब्रह्मचारी ॥ समस्तां पुढे तापशी निर्विकारी ॥ नमो जावया लागला मोक्षपंथा ॥ नमस्कार माझा तया हानुमंता ॥ १ ॥ महारुद्र अवतार हा सूर्य वंशीं ॥ अनाथा पुढें दीन तारावयाशी ॥ असा जन्म झाला चैत्री पौर्णिमेला ॥ नमस्कार माझा तया मारुतीला २ ॥ तनूशीसुशक्ति असे पुण्य ज्यांचे ॥ किती भाग्य वर्णूं तया अंजनीचें ॥ तिच्या भाक्तिलागी असा बाळ झाला॥ नम० ॥ ३ ॥ जातां गिळाया तया भास्कराशी ॥ पुढें जाउनी राव त्याशीच ग्राशी ॥ तया चड्कणा मारितां तोपळीला ॥ नम० ॥ ४ ॥ बहू ठोसरें मारिले रावणाला सिताशुद्धि घेऊनिरे तो उडाला ॥ रघुनाथजीचें पदिं लीन झाला ॥ नम० ॥ ५ ॥ खरा ब्रह्मचारी मना तो विचारी ॥ पुढें जाउनी भेटला रामनारी ॥ दयासागरा भाक्तिनें गौरवीला ॥ नम० ॥ ६ ॥ सुमित्रासुता लागली शक्ति जेव्हां ॥ धरी रूप आक्राळविक्राळ तेव्हां ॥ गिरी आणुनी शीघ्र तो वांचवीला ॥ नम० ॥ ७ ॥ सिताशुद्धि लंकापुरीं जाळियेली ॥ बहू राक्षसा मारुनी ख्याति केली ॥ किती भाग्य वर्णूं तयाच्या बळाला ॥ नम० ॥ ८ ॥ प्रभो मा-

रिलें रावणा राक्षसाला॥ दिले राज्य लंकेंत विभीषणाला॥ सुरा सोडवोनी रणीं घोष केला॥ नम० ॥ ९ ॥ तो हा मारुती होउनी रामदास ॥ हीना दिनाशीच तारावयास॥ धरीं अंतरीं उद्धवा सूतजाला ॥ नम० ॥ १० ॥ अंजनी गर्भ संभूतो वायुपुत्रो महाबली ॥ कुमार ब्रह्मचारीच हनुमंतायतेनमः ॥ ११ ॥

## भीमरूपी स्तोत्र.

कपि विर उठला तो वेग अद्भूत केला ॥ त्रिभुवन जन लोकीं कीर्तिचा घोष केला ॥ रघुपति उपकारें दाटलें थोर भावें ॥ परम धिर उदारें राक्षिलें सौख्यकारे ॥ १ ॥ सकळ दळ मिळालें युद्ध उद्दंड झालें ॥ कपिकटक्क निमालें पाहतां यश गेलें ॥ परदळ–शर–घातें कोटिच्या कोटि प्रेतें ॥ अभिनव रणपातें दुःख बीभीषणातें ॥ २ ॥ कपिरिस–घ[illegible] दाटी ॥ जाहली थोर आटी ॥ म्हणउनि जगजेठी धांवणें चार कोटी ॥ बहुत विरल मृत्यू मोकळे सिद्ध झाले ॥ सकळ जन निवाले धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥ बहु प्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राणनाथा उठवि मज अनाथा दूर सांडूनि व्यथा ॥ झडकरि भिमराया तूं करी दृढ काया ॥ रघुविर भजना या लाग वेगेंचि जाया ॥ ४ ॥ तुजविण मज पाहे पाहतां कोण आहे ॥ म्हणवुनि मन माझेंरे तुझी वाट पाहे ॥ मज तुज निरवीलें पाहिले आठवीलें ॥ सकळिक निज–दासालागें सांभाळवीलें ॥ ५ ॥

उचित हित करावें उद्धरावें धरावें ॥ अनहित न करावे त्वां जनीं यश घ्यावें ॥ अघटित घडवावें सेवका सोडवावें ॥ हरि-भजन घडावें दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥

प्रभुवर विर-राया जाहली दृढ काया ॥ परदळ निवटाया दैत्यकूळें कुटाया ॥ गिरिवर उगटाया रम्य-वेषें नटाया ॥ तुजचि अलगटाया ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥

बहुत सबळ सांठा मागतों अल्प वांटा ॥ न करित हित कांटा थोर होईल ताठा ॥ कृपणपण नसावें पूज्य लोकीं दिसावें ॥ अनुदिन करुणेचें चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥

जलधर करुणेचा अंतरामाजि राहे ॥ तरि तुज करुणा हे कां नये सांग पाहे ॥ कठिण हृदय झालें काय कारुण्य गेलें नपवासि मज कां रे म्या तुझें काय केलें ॥ ९ ॥

वडिलपण करावें सेवका सांवरावें ॥ अनहित न करावें तूर्त हातीं धराव ॥ निपटचि हटवादें प्रार्थिला शद्बभेदें ॥ कपिवन करुणेचा बोळला राम-वेधें ॥ १० ॥ बहुतचि करुणा या लोटली देवराया ॥ सहजचि कपिकेतें जाहली दृढ काया ॥ परम सुख विलासें सर्वदा सानुदासें ॥ पवन-तनुज तोषें वंदिले सावकाशें ॥ ११ ॥

## श्रीरामाचे श्लोक.

माता रामो मत्पिता रामचंद्रः ॥ स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ॥ सर्वस्वंमे रामचंद्रोदयालुर्नोन्यं जाने नैव जानेन

जाने ॥ सत्यव्रतं सत्यपरं त्रिसत्यं सत्यस्ययोनिं निहितंच सत्ये ॥ सत्यस्यसत्यंऋतसत्यनेत्रंसत्यात्मकं त्वां शरणं प्रपन्नः ॥

## श्रीरामाचें ध्यान.

ध्यायेदाजानुबाहुं धृतशर धनुषंबध्ध पद्मासनस्थं ॥
पीतंवासोवसानं नव कमलदलःस्पर्धिनेत्रं प्रसन्नं ॥
वामांकारूढसीता मुखकमलमिलल्लोचनंनीरदाभं ॥
नानालंकारदीप्तं दधतमुरुजटामंडनंरामचंद्रं ॥ १ ॥

## श्रीरामाष्टक.

### चामर वृत्त.

श्रीरामचंद्र पादपद्म पंकजा निरंतर ॥ चंद्रसूर्य वर्णिताति ध्यातसे पुरंधर ॥ नारदादि सामगान गाति गीत शंकर ॥ रामचंद्र प्रेमसार कामधेनु सुंदर ॥ १ ॥ अंबुजाक्ष मेघनीळकांति श्रीमनोहर ॥ दिव्य रत्न तेजपुंज कुंडल प्रभाकर ॥ केयुरादि रत्नहार उत्तरी पितांबर रामचंद्र प्रेमसार कामधेनु० ॥ २ ॥ देह दिव्य साजिरा प्रकाश रास भास्कर ॥ भक्त नेत्र सव्यदासि पादपद्मि सुंदर ॥ संत चित्त चातकाशि मेघश्री सितावर ॥ रामचंद्र० ॥ ३ ॥ चापबाण भातडीं समीपवीर भूधर ॥ वीर्य धैर्य शौर्य सिंधु रामचंद्र दुर्धर ॥ चापबाण चंडनाद घोष पूर्ण अंबर ॥

रामचंद्र० ॥ ४ ॥ एक पत्नि एक बाण सत्य एक उत्तर॥ शूर काम कल्पवृक्ष भक्ति प्रेमसागर ॥ वीरराज राज्यपुत्र धीट नीट नागर ॥ रामचंद्र० ॥ ५ ॥ सुग्रिवादि जांबुवंत-जुत्पती महाविर ॥ तीष्ठताति पाणि युग्म जोडुनी निरंतर॥ सूर्यपुत्र हेमदंड छत्रदीव्य चामर ॥ रामचंद्र० ॥ ६ ॥ याम्य काळ कापताति धाकती निशाचर ॥ ब्रह्मघोष भीति थोर तोषयुक्त खेचर॥ भक्तराज प्रेमकाजयुक्त हर्ष निर्भर॥ रामचंद्र० ॥ ७ ॥ नित्यगीत दिव्य कीर्तिसार शब्द गंभिर॥ टाळभृत्य वाजवीत मारुती महाविर ॥ राघवेंद्र योगिराज आयताक्ष सुंदर ॥ रामचंद्र० ॥ ८ ॥

## श्रीरामाचें अष्टक २ रें.

हे क्षीरसागरनिवास अनाथ बंधू ॥ हे शेषशाइवरदायक प्रेमसिंधु ॥ हे भक्तवच्छल कृपा करि स्वामियारे ॥ सीता-पती तुज कशी करुणा नयेरे॥ १ ॥ देवाधि देव जगजी-वन लोकनाथा ॥ देवादिका रघुपती सखया समर्था ॥ कल्पद्रुमातुन्हदयीं किति पाहसीरे ॥ सी० ॥ २ ॥ नारा-यणा नरहरी मधुसूदनारे॥ लोकेश पालन जगत्रय जीवनारे॥ विश्वंभरा यदुविरा भगवंत जीरे ॥ सी० ॥ ३ ॥ हे यादवा जडजिवा श्रम फार झाला ॥ हे माधवा भवपुरीं जिव फार म्याला ॥ हे सावळ्या सगुण सुंदर डोळसारे ॥ सी० ॥ ४ ॥ हे पुंडलीक वरदायक पांडुरंगा ॥ हे माधवा भवपुरीं भव-दुःख भंगा ॥ हे राजसा रघुपते रघुपुंगवारे ॥ सी० ॥ ५ ॥

मी वाहतो मज कृपा करिरे मुरारी ॥ सोसूं किती सकळही दुरिता निवारी ॥ मी शीणलो रघुपते तूं येई त्वरेरे ॥ सीतापती तुज कशी करुणा नयेरे ॥ ६ ॥ भावेंच ध्यान धरिता तुज. आठवीता ॥ रक्षी कृपा मजवरी करिरे अनंता ॥ मी शीणलो वहुतया भवसागरारे ॥ सी० ॥ ७ ॥ वेदांतसार भवसिंधुपते मकुंदा ॥ लीलावतारि कमळानन ज्ञानचंद्रा ॥ तारुण्यसिंधु शिवध्यान परायणारे ॥ सी० ॥ ८ ॥ प्रल्हाद नारद शुकादि मुनेश्वरासी ॥ विश्रामधाम दिधले करुणारसासी ॥ ध्याताचि शांत शिवध्यान परायणारे ॥ सितापती तुज कशी करुणा नयेरे ॥ ९ ॥

## श्रीरामाचें अष्टक २ रे.

अयोध्यापति तो शरयू तिरचा दाशरथी ॥ पतीत पावन त्याला सीतापति म्हणती ॥ प्रेम प्रितीनें घेऊन त्याचे नामाला ॥ भावें नमितों श्रीपंचवटीचे रामाला ॥ १ ॥ दक्षण हस्ते लक्ष्मण तो प्रीय वंधु ॥ वैराग्याचा केवळ जैसा क्षीरसिंधु ॥ धरी वामांकि जानकी राघव प्रेमाला ॥ भावें नमितों० ॥ २ ॥ कर जोडुनिया सन्मुख उभा हनुमंत ॥ पूर्ण प्रतापी सवळवळी तो वळवंत ॥ रघुविर स्मरणीं क्षणएक न चुके नेमाला ॥ भावें नमितों० ॥ ३ ॥ सनकसनंदन नारद तुंबर मुनियोगी ॥ भग्वत्भक्त तें रंजित हरी कीर्तनरंगीं ॥ सुरवंर गाति अभिमन्यूच्या नामाला ॥ भावें० ॥ ४ ॥ वाल्या कोळी पावन झाला

नामानें ॥ शंभर कोटी कथिले रामायण त्याने ॥ रघुविर स्मरणीं क्षण एक न चुके नेमाला ॥ भावें० ॥ ५ ॥ तारी अहील्या निजवाल्या धरि सहचेल्या ॥ अमृतवल्या घृत केल्या मधुकुल्या ॥ माता कौसल्या वंदन करिते पादपद्मा-ला ॥ भावें० ॥६॥ गोदातीर पंचवटी हें वैकुंठ ॥ शिवकैलाशीं निशिदिनिं ध्यात निळकंठ ॥ गिरज्यावल्लभ जाळुन टाकी कामाला ॥ भावें० ॥ ७ ॥ उच्छिष्ट बोरें अर्पण केली शब-रीनें ॥ राघव भक्षी भजन केलें गणकेने ॥ विमानि वाहोन नेली मंगलधामाला ॥ भावें० ॥ ८ ॥ वसंत माधव रामन-वमीं उत्सव ॥ ब्रह्मानंद किति मी वर्णू वैभव ॥ जनस्थानिं ठाव द्यावा आह्माला ॥ भावें० ॥ ९ ॥ या नरदेहीं हरि कीर्तनही जोड ॥ श्रीरामाचें नाम अमृत बहु गोड ॥ काय करावें अल्प सुखाचें हेमाला ॥ भावें० ॥ १० ॥ लक्ष चौऱ्यांशी योनीमध्यें हें सार ॥ नामा म्हणे नाम अमृत गोड फार ॥ जीव्हें वाचोन नकळे शरीर चाल्ला ॥ भावें० ॥ ११ ॥ ब्रह्मगीरीचे शिखरीं गंगा उत्पन्न ॥ विरा-जमान गंगा द्वारा येऊन ॥ चारि मुक्ति येऊन लागति पादपद्माला ॥ भावें० ॥ १२ ॥ वामभागीं सुंदर कन्या जन-काची ॥ विश्वमाता पुतळी केवळ कनकाची ॥ तीच्या तेजें विस्मृति झालि तमहरत्या ॥ दासालागी सत्वर पावे रघुनाथा ॥ १३ ॥ प्रातःकाळीं रघुविर स्तोत्र करी पठण ॥ तो हरी भक्त निश्चय जाणावा पूर्ण ॥ च्यारी मुक्ति येऊनि लागति पादपद्माला ॥ भावें० ॥ १४ ॥

# श्रीरामाचें नमस्कार.

अयोध्यापती वंदितो रामराणा ॥ श्रुती शास्त्रिं हा मान्य तो कीं पुराणा ॥ तयाचे पदीं साजती राजमुद्रा ॥ नमस्कार माझा सिता रामचंद्रा ॥ १ ॥ महाराज ते पंचधांमीं निवाशी ॥ सिताराम हो नांव हें मारुतीसी ॥ यशानें जगीं तोषवी सूर्यचंद्रा ॥ नम० ॥ २ ॥ सखाराम हा देव लावण्य रूपी ॥ महाधीर गंभीर पूर्ण प्रतापी ॥ प्रतापें स्वये दीधलें धाम इंद्रा ॥ नम० ॥ ३ ॥ मतीमंद मी थोर आज्ञानराशी ॥ तुझ्या दर्शनें ज्ञान माझे प्रकाशी ॥ दयावंत अज्ञान नाशा समुद्रा ॥ नम० ॥ ४ ॥ सख्या जन्मतां तूं मला पाळियेले ॥ तुझे दर्शना चित्त माझे भुकेले ॥ तुवा तारिले बा गजेंद्राशि नक्रा ॥ नम० ॥ ५ ॥ दयानिधे दे मजला सुबुद्धी ॥ हरी कीर्तनें सर्वदा सर्व सिद्धीं ॥ दिसेना आमी कसा योगिइंद्रा ॥ नम० ६ ॥ तुझी राघवा काय मी वर्णु लीला ॥ अहील्या शिळा तारिली तूं दयाळा ॥ तुला ध्यातिरे पार्वती आणि रुद्रा ॥ नम० ॥ ७ ॥ शिवाजी तुला काळ मोठा भवाजी ॥ असे जाणुनी प्रभ या वैभवाजी ॥ जसे मांजरा काळ नेईल उंद्रा ॥ नमस्कार० ॥ ८ ॥ सितारामचंद्रा तुम्हीहो शहाणे ॥ हरी सारखी अर्जुनाचे निदानें ॥ असे संकटीं रूप घेशीं समुद्रा ॥ नम० ॥ ९ ॥ नरा घोर संसार हा थोर माजे ॥ तुला ध्यातसे विनक नीज राजे ॥ गुरू अमृतकेशरि दिव्य

मुद्रा ॥ नम० ॥ १० ॥ सदा रामरूपा मि पाहीन डोळा ॥ अशी भक्ति देई मला विश्वपाळा ॥ सदारामरूपावडेहो कपिंद्रा ॥ नम० ॥ ११ ॥ पठे स्तोत्र हें भक्तिनें नित्य वाचें ॥ सदा जनीं जानकी जीवनाचें ॥ तया देयिरे सौख्य तूं ज्ञानमुद्रा ॥ नम० ॥ १२ ॥ असे संतती संपती सौख्य मोठे ॥ परी शेवटीं सर्वही कर्म खोटें ॥ हरी वाचुनीं लाभ कैचा नगेंद्रा ॥ नमस्कार० ॥ १३ ॥

## श्री अहिल्यास्तोत्र प्रारंभ.

अहिल्योवाच ॥ अहोकृतार्थोऽस्मिजगन्निवासते ॥ पादाब्जसंलग्नरजःकणादहम् ॥ स्पृशामियत्पद्मजशंकरादिभि र्विमृग्यतेरंधितमानसैः सदा ॥ १ ॥ अहो विचित्रंतवरामचेष्टितं मनुष्यभावेनविमोहितंजगत् ॥ चलस्यजस्रंचरणादिवर्जितः संपूर्णआनंदमयोऽसिमायिकः ॥ २ ॥ यत्पादपंकजपरागपवित्रगात्रा ॥ भागीरथी भवविरिंचिमुखात्पुनाति ॥ साक्षात्सएवममदृग्विषयोयदास्ते ॥ किंवर्ण्यतेममपुराकृतभागधेयम् ॥ ३ ॥ मर्त्यावतारमनुजाकृतिंहरिं ॥ रामाभिधेयंरमणीयदेहिनम् ॥ धनुर्धरं पद्मविशाललोचनं ॥ भजामिनित्यंनपरान्भजिष्ये ॥ ४ ॥ यत्पादपंकजरजः श्रुतिभिर्विमृग्यं ॥ यन्नाभिपंकजभवः कमलासनश्च ॥ यन्नामसाररसिकोभगवान्मुरारि ॥ स्तंरामचंद्रमनिशंहृदिभावयामि ॥ ५ ॥ यस्यावतारचरितानिविरंचिलोके ॥ गायंतिनारदमुखाभवपद्मजाद्याः ॥ आनंदजाश्रुपरिषिक्तकुचाग्रसीमा ॥ वागीश्वरी-

चेतमहंशरणंप्रपद्ये ॥ ६ ॥ सोऽयंपरात्मापुरुषः पुराणः ॥ एषः स्वयंज्योतिरनंत आद्यः ॥ मायातनुंलोकविमोहिनीयां॥ धत्ते परानुग्रहएषरामः ॥ ७ ॥ अयंहिविश्वोद्भवसंयमाना ॥ मेकः स्वमायागुणबिंबितोयः ॥ विरंचिविष्णवीश्वरनामभेदान् ॥ धत्तेस्वतंत्रः परिपूर्णआत्मा ॥ ८ ॥ नमोऽस्तुतेरामतवांघ्रिपंकजं ॥ श्रियाधृतंवक्षसिलालितंप्रियात् ॥ आक्रांतमेकेन जगत्त्रयंपुरा ॥ ध्येयंमुनींद्रैरभिमानवर्जितैः ॥ ९ ॥ जगतामादिभूतस्त्वंजगत्त्वं जगदाश्रयः ॥ सर्वभूतेष्वसंसक्तएको भान्विभवान्परः ॥ १० ॥ ओंकारवाच्यस्त्वंरामवाचामविषयःपुमान् ॥ वाच्यवाचकभेदेनभवानेवजगन्मयः ॥ ११ ॥ कार्यकारणकर्तृत्व फलसाधनभेदतः ॥ एकोविभासिरामत्वंमाययाबहुरूपया ॥ १२ ॥

त्वन्मायामोहित धियस्त्वांनजानंतितत्वतः ॥ मानुषंत्वाऽभिमन्यंतेमायिनंपरमेश्वरम् ॥ १३ ॥ आकाशवत्त्वंसर्वत्रबहिरंतर्गतोमलः ॥ असंगोह्यचलोनित्यः शुद्धोबुद्धःसदव्ययः ॥ १४ ॥ योषिन्मूढाऽहमज्ञातेतत्वंजानेकथं विभो ॥ तस्मात्तेशतशोरामनमस्कुर्यामनन्यधीः ॥ १५ ॥ देवमेयत्रकुत्रापिस्थितायामपिसर्वदा ॥ त्वत्पादकमलेसक्ता भक्तिरेवसदास्तुमे ॥ १६ ॥ नमस्तेपुरुषाध्यक्षनमस्तेभक्तवत्सल ॥ नमस्तेऽस्तुहृषीकेशनारायणनमोस्तुते ॥ १ ॥ भवभयहरमेकंभानुकोटिप्रकाशंकरधृतशरचापं ॥ कालमेघावभासंनम्कनकरुचिरवस्त्रंरत्नवत्कुंडलाढ्यं ॥ कमलविशदनेत्रंसानुजंराममीडे ॥ १८ ॥ स्तुत्वैवंपुरुषंसाक्षाद्राघवंपुरतः स्थि-

तम् ॥ परिक्रम्यप्रणम्याशुसानुज्ञातायययौपतिम् ॥ अहिल्या याःकृतंस्तोत्रंयःपठेद्भक्तिसंयुतः ॥ समुच्यतेऽखिलैःपापैःपरं ब्रह्माधिगच्छति ॥ १९ ॥ पुत्राद्यर्थेपठेद्भक्त्यारामंहृदिनि धायच ॥ संवत्सरेणलभतेवंध्याअपिसुपुत्रकम् ॥ २० ॥ ब्रह्मघ्नोगुरुतल्पगोऽपिपुरुषस्तेयोमुनींद्रैःस्तुतः ॥ मातुर्भ्रातु-रघोविहिंसकरसौनित्यंभवत्यल्पधीः चेदंस्तोत्रमजंजपन्रघुप-तेर्भक्त्याहृदासंस्मरन् ध्येयंमुक्तिमुपैतिकिंपुनरसौस्वाचारयु क्तोनरः ॥ २१ ॥ इति अहिल्याकृत स्तोत्रं संपूर्ण ॥

## अथ ध्यानं.

क्षीरोदस्यत्प्रदेशे शुचिमणिविलसत्सैकतैर्मौक्तिकानां ॥माला न्धृत्वासनस्थस्फटिकमणिनिभैर्मौक्तिकैर्मण्डितांगः ॥ शुभ्रै रभ्रैरदभ्रैरुपरिविरचितैर्मुक्तपीयूषवर्षैरानंदीनःपुनीयादरिनलि नगदाशंखपाणिर्मुकुंदः ॥ १ ॥

## अथवा

भूःपादौ यस्य नाभिर्वियदसुरनिलश्चंद्रसूर्यौच नेत्रे कर्णावा-शाशिरोद्यौर्मुखमपिदहनोयस्य वासोज्यमब्धिः ॥ अंतस्थं यस्य विश्वंसुरनरखगगो भोगिगन्धर्वदैत्यैश्चित्रं रंरम्यतेतं त्रिभुवनवपुषंविष्णुमीशन्नमामि ॥ २ ॥

# श्रीविष्णुची स्तुती.

वंदूनियां जलधिजा पतिच्या पदांतें ॥ वर्णीन मी हरि-
चिया तनु शोभतांतें ॥ बोलें मुनी कपिल भागवती गुणाचें
माते सतेज गुण गाइन केशवाचे ॥ १ ॥ ध्यावें बरे हरि-
चिया पदअंकनाचे ॥ वज्रांकुशध्वजसरोरुहलांछनाचे ॥
आरक्त तुंगनख विलसे प्रभानें ॥ नासी अनादि तम सूर्य
जसा प्रभातें ॥ २ ॥ प्रक्षाळितां चरण तें शिव त्या
जळाला ॥ घेता शिरीं गरळ दाह निवे जळाला ॥ माथा
धरोनि शिवजो शिवनीर झाला ॥ ध्यावें असें चरण त्या
पदनीरजाला ॥ ३ ॥ मांडीवरी चरण सुंदर पादपद्म ॥
पाणी निजाचुरि ठेवुनि नित्य पद्मा ॥ प्रीतिं करूनि
चुरते जननी जनाची ॥ माता विधीचि तुही भवभंजनाची
॥ ४ ॥ ज्या मांडिया खग भुजावरि विमान ॥ ज्या साव-
ळ्या अतिशिरा कजुगासमान ॥ पितांबरावरि कटीं अति
रम्य वांकें ॥ पंक्ती जिळामणि मयउघुचंटिकांची ॥ ५ ॥
नाभींत ि चाळ पद्म निरि जात ॥ त्रैलोक्य उद्भव
जया ज्या पद्म जात ॥ निर्णिणें उर नसे मन भाव दावी॥
पाहुं नितें त्या अति भाव दावी ॥ ६ ॥ श्रीयुक्त
वक्षस्थ त्या भवमोचनाचे ॥ देतें मनासि सुख व ढावे
लोचनाला ॥ ज्या मंदिरें आश्रित ब्रह्मुणांनुणीं ॥ ध्यावे
असें सकळ गीररसांनुयोजें ॥ ७ ॥ ध्यातीं चराचर नम-

स्कंत केंदूराते॥ जो कौस्तुभें मिरवितो अति सुंदराते॥ धारा दहाशत सुदर्शन चक्रहाती ॥ पद्मांत हंसकरि शंक कसा पहाती ॥ ८ ॥ कौमोदकींप्रियगदा स्मर अंतरंगीं ॥ जी स्थापिली अतुर मर्दुनि अंतरंगीं ॥ गुंजारवें परम सेवितभृंगमाला कंठीं मणी लपवि जो स्थिर जंगमाला ॥ ९ ॥ ज्याच्या दयार्द्रह्रदयीं जगतानि रूपी ॥ त्याच्या मुखा असुख कोण जगांत लेपी ॥ गंडस्थळीं मकरकुंडल मौक्तिकाची ॥ डोले प्रभा सरळ त्या अशि नासिकेची॥ १०॥ श्रीज्यात लुब्ध कुटिलालकभृंगमाला ॥ श्रीमीनली मकर ज्या वदनांबुजाला ॥ ध्यावें विशेष अवलोकुनि लोचनाचे॥ तापत्रया निववि जे भवमोचनाचे ॥ ११ ॥ वाचें स्मरारि अति सुंदर हास्य मंद ॥ प्रेमप्रसाद सुर ज्यांत दिसे अमंद ॥ शोभे मुखाब्ज नयनांबुज जें करोनी॥ तेंव्हां रमा धरित दिव्य करें वरोनी ॥१२॥ ध्यानासि आश्रय असे अशि मात्र देहीं॥केलें असे करविलें इतरा नव्हे हीं॥आरक्त दंत अधरांबुज तेज ज्यांत॥ध्यावा रमापति असा ह्रदयांबुजांत १३ रूपीं असा हरिचिया जडताच भाव ॥ प्रेमें मनीं उठति सात्विक अष्ट भाव॥ जो आठवे हरिस मानस हंस रूपीं ॥ प्रेमें मनीं सघन तो अथवा स्वरूपीं ॥ १४ ॥ हें ध्यान पद्यासि चतुर्दश पद्ममाला ॥ पाईं समर्पिलि असे पुरुषोत्तमाला ॥ पद्माशि पद्य सुनिधे मुखिं वामनाच्या ॥ वृत्ती अनेक जळण्यास्तव या मनाच्या ॥ १५ ॥

# विठ्ठलाचे श्लोक.

समचरणसरोजं सांद्रनीलांबुदाभं ॥ जघननिहितपाणिं मंडणं मंडणानां ॥ तरुण तुळसिमाला कंधरं कंजनेत्रं ॥ सदय धवल हासं विठ्ठलं चिंतयामि ॥ १ ॥ परम पुरुषशौरी पांडुरंगा मुरारी ॥ कमल नयन कान्हा गोपिका चित्तहारी ॥ प्रगट निकट शोभे रुक्मिणी रम्यवामीं ॥ सदय० ॥ २ ॥ स्मरजनक मुकुंदा सच्चिदानंदकंदा ॥ अखिल रुप अभेदा नाकळे पारवेदा ॥ मुनिजन गुणगाती शंभु संतोष नामीं ॥ सदय० ॥ ३ ॥ घननिळ तनु शोभे कांस पीतांबराची ॥ विमल कमळ माळा डोलते हो गळ्याची ॥ विहरत हरि माझा पंढरी नामग्रामीं ॥ सदय० ॥ ४ ॥ मुरलि अधरि वाहे ठाण मांडी त्रिभंगी ॥ असुर विबुध मोहे साधुचे ध्यान रंगी ॥ जडित मुगुट साजे डोलते हे विरामी ॥ सदय० ॥ ५ ॥ यदुकुळ वनमाळी द्वारकाधीश शौरी ॥ मुनिहृदय निवासी श्रीपती कैटभारी ॥ क्रिडति सगुण रूपें चिन्मयानंदधामिं ॥ सदय० ॥ ६ ॥ कलयुगिं प्रगटे हा पुंडलीका प्रसादें ॥ निरसिल भवव्यथा जाण पादारविंदें ॥ निशिदिनिं गुण गावें लीन होऊनि नामीं ॥ सदय० ॥ ७ ॥ सुर गुरु अवतारी गोकुळी आठवाहो ॥ व्रजजन सुर वृंदा अंतरीं आठवाहो ॥ स्वरुप अतुळ ज्याचें नेणती कोटि कामी ॥ सदय० ॥ ८ ॥ श्री विठ्ठलाष्टक असें पठती प्रभातें ॥ धावूनि विठ्ठल तया

कुरवाळि हातें ॥ जाणोनिया स्तवन सूर्य करी स्वदेशा ॥ भावें स्मरोनि स्तविलें भव व्यंकटेशा ॥ ९ ॥

## ॥ विठोबाचे नमस्कार ॥

॥ विठो पंढरी भूमि वैकुंठ केली ॥ स्वदासांसवें तूं कराया सु केली ॥ सदा रंगही इच्छिसी साधुसंगा ॥ नमस्कार माझा रुक्मिणीपांडुरंगा ॥ १ ॥ विभो भक्तिनें मोक्षही तुच्छ केला ॥ गुणा गावया वेद तोही भुकेला ॥ धरी पावुलें स्वर्नदी चंद्रभागा ॥ नमस्कार० ॥ २ ॥ हरें तूमची व्यक्ति केली अजाची ॥ अशी भक्ति त्या पुंडलीक द्विजाची ॥ नदीं क्रीडशी त्यागुनी श्रीरमांगा ॥ नमस्कार० ॥ ३ ॥ प्रभो पावलीं चित्तवृत्ति मुरावी ॥ सदा प्रेम सत्कीर्ति लोकीं उरावी ॥ मनाची हरी वासना तुच्छ भंगा ॥ नमस्कार० ॥ ४ ॥ कृपाळा बहू तारिले दीन दास ॥ नको होऊं बापा मला तूं उदास ॥ त्वरें उद्धरीं देउनी नामगंगा ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ अजा माउली सर्व विश्वास दावी ॥ क्षणाचा न आयुष्य विश्वास दावी ॥ ह्मणोनी त्वरें इच्छितों पादरंगा ॥ नम० ॥ ६ ॥ भवघ्ना भवाब्धी भरे पूर्ण पाणी ॥ बुडालों धरव्या धाव दे पूर्णपाणी ॥ जनीं आदिमाया करी थोर दंगा ॥ नमस्कार० ॥ ७ ॥ रमेशा मला अल्प धीरा विलोकीं ॥ तुझी भक्ति हे सध्वजाला विलोकीं ॥ असा पूर्ण नारायणा दे सुरंगा ॥ नमस्कार० ॥ ८ ॥ भिमेचे तिरीं ग्राम

तें विठ्ठलावें ॥ तया नाम शोभे पंढरीपूर साचें ॥ तिथें नांदगे चंद्रभागा सुगंगा ॥ नमस्कार० ॥ ९ ॥ विटेवरि ऊभा कटीवर बाहू ॥ चला साजणीगे अम्ही देव पाहूं ॥ शिरीं धरीलेंरे शिवज्योतिलिंगा ॥ नमस्कार० ॥ १० ॥ वसे कृष्णजी घेउनी राधिकेला ॥ अनें देखतां कोपली भीमबाळा ॥ रुसोनि वनीं रे वा त्य नि ंगा ॥ नम० ॥ ११ ॥ प्रभू कृष्णजी शोधुनी रुक्मिणीला ॥ बुझा- वोनि आणे स्वयें पंढरीला ॥ तिथें राहिलागे प्रभू सं ा संगा ॥ नमस्कार० ॥ १२ ॥ महाक्षेत्र केलें असे या वनाला ॥ तिथें उद्धरीलें स्वयें दिंडिराला ॥ महाक्षेत्रहो पाप जाईल भंगा ॥ नमस्कार० ॥ १३ ॥ पंढरीमधें वास या विठ्ठलाचा ॥ भिमेचे तिरीं आश्रम पुंडलिकाचा ॥ महाभक्त तेणें हरी तोषवीला ॥ नमस्कार माझा रुक्मि- णी विठ्ठलाला ॥ १४ ॥ काशीला जातां कुक्कुटाश्रमीं ॥ उपदेश आला पुंडलिकातें ॥ द्यावून संगीत मातापित्या- ला ॥ नमस्कार० ॥ १५ ॥

## ॥ श्री गोविंदाष्टक स्तोत्र ॥

॥ गोविंद गोप सखगो द्विज सानुपाला ॥ गोवर्धनाचलधरा वसुदेव बाला ॥ गोपी मनोहरतनो जगदीश्वराहो गोविंद- जी तव पदीं मम चित्त राहो ॥ १ ॥ विंध्याचलोपम पडो तव पादपद्मीं ॥ हा देह दग्ध न व्हा स्वा कुंठसद्मीं ॥ मी अज्ञ दीन मतिहीन दया कराहो ॥ गोविंदजी तव० ॥

२ ॥ दामोदरा फणिफणावरि रूप नाचे ॥ तें दाऊनि घरि हरीं भ्रम मन्मनाचे ॥ पीतांबरासिंदर पद्मगदाधराहो ॥ गोविंदजी तव० ॥ ३ ॥ यद्ब्रह्म निर्गुण परात्पर निर्विकार ॥ सत्याक्षराख्यहि अनंत पुराण सार ॥ तें तूंचि निश्चय मला कळलें बरेंहो ॥ गोविंदजी तव० ॥ ४ ॥ न त्राणकारक दुजा भवदुःखहर्ता ॥ धर्ता विनाशकहि विश्व अशेषकर्ता ॥ भर्ता प्रभो सकळ तूं जगदंकुराहो ॥ गोविंदजी तव० ॥ ५ ॥ मोघाक्रिया अखिलही तुजवीण बापा ॥ गोविंद नामपथ हाचि कलींत सोपा ॥ त्रापा अपार तरले भज उद्धराहो ॥ गोविंदजी तव० ॥ ६ ॥ श्रुत्यर्थ हाहि नकळे भजनीं न रूढ ॥ मी दुष्ट नष्ट अति भ्रष्ट कनिष्ट मूढ ॥ हे दीनवत्सल मला चरणीं धराहो ॥ गोविंदजी तव० ॥ ७ ॥ ते साधु संत बरवे तुज आठवीतीती ॥ चित्तीं हृदांबुजिं पदांबुज सांठवीती ॥ नारायणा मजहिं भृत्य तसा कराहो ॥ गोविंदजी तव० ॥ ८ ॥

## ॥ श्रीकृष्णाचे नमस्कार ॥

॥ देवकी तुझें पुण्य कोट्यानकोटी ॥ हरीसारिखें जन्मलें रत्न पोटीं ॥ भुमीभार हारावया जन्म घेती ॥ नमस्कार माझा तुह्मा कृष्णमूर्ती ॥ १ ॥ यशोदे तुझें पुण्य जन्मांतरींचें ॥ कृपासागरा जाणिती अंतरींचें ॥ जगीं धन्य तो नंदआनंद चित्तीं ॥ नमस्कार माझा० ॥ २ ॥ पिता जन्मतां भोजप बंदिखानीं ॥ यशोदे घरीं वाढतो

चक्रपाणी ॥ जसें पुण्य ज्याचें तसें सुख घेती ॥ नमस्कार माझा० ॥ ३ ॥ यशोदा पदीं नाहाणि बाळकाला ॥ भरी तेल कानीं शिरीं लोंबन ला ॥ नाव्या नळयाचे घेरं उष्ण होती ॥ नमस्कार माझा० ॥ ४ ॥ अडवा तिथें फुंकिति कर्ण ज्याचें ॥ निजवि पाळण्या हालवि मोर नाचे ॥ जशी चापकुरी श्रुती वेदगाती ॥ नमस्कार० ॥ ५ ॥ सुरंगी जशी धार वाहे जळाची ॥ तशी ठेवण वांकुड्या जावळाची ॥ बरा टीळक शोभतोहो ललाटीं ॥ नमस्कार मांझा० ॥ ६ ॥ यशोदे घरीं अंगणीं कृष्ण खेळे ॥ सरी सांवळ्या शोभती नखवाळे ॥ बऱ्या वाघऱ्या कोकिळा आळवीती ॥ नमस्कार माझा० ॥ ७ ॥ यशोदे घरीं आंगणीं चक्रपाणी ॥ रवी चंद्रमा भासती नेत्र दोन्हो ॥ बऱ्या भीवया दीसती चापवृत्ती ॥ नम० ॥ ८ ॥ हरीऊजवा पाय ठेवि भुमीशी ॥ दुजा दूसता ठेवितो मांडियेशी ॥ उभा वणवा भक्तितो कोणि हस्ती नमस्कार माझा० ॥ ९ ॥ हरीचे पदिं शोभतो दिव्य मोचे ॥ जरीचे झगे मोकळे बंद त्याचे ॥ टोपी रूपाळी ठशे दिव्य कांती ॥ नमस्कार० ॥ १० ॥ जटा पांच तोंडे दहा हस्त ज्याला ॥ उगीरे उगी बाळका बाऊ आला ॥ नको गे नको थोपटु दोन्ही हस्ती ॥ नमस्कार० ॥ ११ ॥ जटा पांच तोंडें शिरी जानु गंगा । अर्धांगी उमा पाहिसो जोगि ऊभा ॥ काखेंत बट्वा दुजा दंड हस्ती ॥ नमस्कार माझा तुह्मा कृष्णमूर्ति ॥ १२ ॥

## तुळशीचा श्लोक.

यन्मूले सर्व तीर्थानियन्मध्ये सर्वदेवताः यदग्रेतो वेदाश्च तुलसित्वांनमाम्यहम् ॥ श्रीतुळशीदेव्यैनमः ॥

## तुळशीचा नांवें.

चाल ओव्याची.

तुळशी नाम एक ॥ श्रीनाम दुसरें देख ॥ तिसरें बोलीले अवश्यक ॥ ह्मणा ऐसे ॥ १ ॥ लक्ष्मीनाम चवथें ॥ तिच्या पाचवें नेमस्तें ॥ यशश्री सहवें गणितें ॥ केलें आहे ॥ २ ॥ धर्मावर्नीनाना ॥ सातवें नाम जाणा ॥ देवी आठवें ह्मणा ॥ नाम देवीचीं ॥ ३ ॥ देवदेवी मम प्रीये ॥ ॥ नवें नांव जाणती स्वयें ॥ लक्ष्मी नाम दशम होय ॥ निश्चयेसीं ॥ ४ ॥ सखी नाम एकादश ॥ शूभनाम द्वादश ॥ भूमि नाम त्रयोदश ॥ जाणावे पैं ॥ ५ ॥ अचळ नाम चतुर्दश । अमिळा नाम पंचदश ॥ अमळा नाम षोडश ॥ ऐसीं नामें सांगितलीं ॥ ६ ॥ या उपरी प्रल्हाद ह्मणे स्वामी ॥ हीं नामें सांगितलीं तुह्मीं ॥ तीं परिसोनिया आह्मी ॥ समाधान पावलों ॥ ७ ॥ श्रीतुळशीदेव्यैनमः ॥

## श्रीतुळशीचे नमस्कार.

श्रीतुळशीहो माउली सुदरीते ॥ हस्तद्वया जोडुनि वीनवीतें ॥ तुझी असे आवडि कृष्णजीला ॥ नमस्कार माझा

हरी तूळशीला ॥ १ ॥ तुझे मुळीं राहाति सर्व तीर्थें ॥ तेत्तीस कोटी सुरघोष तेथें ॥ पदीं राहुनी वेद वर्णीत लीला ॥ नमस्कार० ॥२॥ जे तूळशिच्या कांठिं माळा करोनी ॥ स्वयें घालिती आपुले कंठस्थानीं ॥ प्रभू मुक्ति देई पहाहो तयाला ॥ नमस्कार० ॥ ३ ॥ सौभाग्य नारी तुळशी पुजीती ॥ त्या सुख सौख्या अति भोगिताती ॥ पुत्राणि पौत्र मिळती तयाला ॥ नमस्कार माझा० ॥ ४ ॥ ज्या तुळशीची हो करीतील भक्ति ॥ तया प्राप्त होतील चारीहि मुक्ति ॥ असे सांगतीहो प्रभू उद्धवाला ॥ नमस्कार माझा० हरी तूळशीला ॥ ५ ॥

## तुळशीपत्र.

सहस्र अश्वमेध यज्ञपुण्यसोमकोटिशी ॥ स्वच्छ धेनु लक्ष दान मूर्तिवंत गोदेशी ॥ पर्जन्य शीत उष्ण तीव्र देहिं सर्व साहिले ॥ जरी हरीस तुळशि पत्र नित्य एक वाहिले ॥ १ ॥ त्रियोग ध्यान आदि सांग नित्य जो निरंतरी ॥ सुवर्णमेरू गौतमीस स्नान सप्त सागरीं ॥ पुराण वेद शास्त्र मंत्र तंत्र सर्व साहिले ॥ जरी हरी० ॥ २ ॥ शब्दराशि साधुनी वियोग युक्ति साधिली ॥ अनंत साधु सेवनीं तनू सदाच लाविली ॥ प्रचंड काम क्रोध लोभ मोह सर्व साहिले ॥ जरी हरीस० ॥ ३ ॥ प्रयाग काशि बद्रिकाश्रमीं अखंड वास ज्यासिहो ॥ पंधरोस ब्रह्मराशि फार पुण्य त्यासिहो ॥ द्वादशादि ज्योतिर्लिंग नित्य

दृष्टि पाहिले ॥ जरी हरीस० ॥ ४ ॥ सुवर्णमेरु आपिल्या घडे मही प्रदक्षणा ॥ साधिली या जपतप सुशील सर्व साधन ॥ गोपाल सूत स्वामीच्या पदीं चित्त राहिले। जरी हरीस तुळशी० ॥ ५ ॥

## ॥ धांवा तुळशीचा ॥ अभंग चाल ॥

॥ जाईन वृंदावना ॥ करीन प्रदक्षणा ॥ आळवीन कान्हा ॥ देवकीचा ॥ १ ॥ आळवी पांचाळी ॥ येईवा वनमाळी ॥ राखावें या काळीं ॥ सत्व माझें ॥ २ ॥ सत्वाचें प्रगट ॥ कृष्ण वरवंट ॥ अधर्माचे वाट ॥ जाऊं नेदी ॥ ३ ॥ धर्माशी रक्षण ॥ श्रीकृष्ण आपण ॥ येईवा धांवोन ॥ मायबापा ॥ ४ ॥ येई झडकरी ॥ कृष्णाग्री सुंदरी ॥ दुष्ट अवधारी पीडिताती ॥ ५ ॥ भक्तासी रक्षणा ॥ कृपाळु नारायणा ॥ क्लेश निवारणा ॥ शीघ्र येई ॥ ६ ॥ येई तूं झडकरी ॥ कृष्ण माये सुंदरी ॥ दुष्ट आवधारी ॥ पीडिताती ॥ ७ ॥ दुर्वासऋषी ॥ गेले स्नानाशी ॥ त्यासीं भोजनासी ॥ काय वाढूं ॥ ८ ॥ काय वाढूं त्यांसी ॥ कोण्या पदार्थासी ॥ कोठें गुंतलीसी ॥ कृष्ण माये ॥ ९ ॥ बहू मी त्रासलें । बंधु उबगले । झणुनी माझे बोला ॥ न देशी चित्त ॥ १० ॥ करुणेची वाणी । ऐकावी चक्रपाणी ॥ येई मायेबहिणी । द्वारकेचे ॥ ११ ॥ हरी ताटीं बैसतां । रुक्मिणी वाढितां । धांवा हा अवचित्ता । पडला कानीं ॥ १२ ॥ धांवा पडला कानीं । उठले चक्रपाणी

गरुडावरी बैसुनी । शिघ्र आले ॥ १३ ॥ भाजीचें पान । सेवी जनार्दन । सकळ विश्वजन । तृप्त झाले ॥ १४ ॥ सकळ तृप्त झाले । ऋषींची मंडळी ॥ द्रौपदी न्याहाळी । कृष्णमुख ॥ १५ ॥ कृष्णमुख निहाळी । पाहे नेत्रकमळी । पावले वनमाळी । द्वारकेचे ॥ १६ ॥ द्वारकेचे हारी । पांडवांचे साहकारी । द्रौपदीचे कैवारी । पाठीराखा ॥ १७ ॥ पीतांबर शेला । गगनीं झळकला । द्रौपदी ह्मणे आला ॥ भाई माझा ॥ १८ ॥ द्रौपदीचा धांवा गाती । ज्या नारी ऐकती । त्यांसां पुत्रसंतती । देई देवा ॥ १९ ॥

## ॥ तुळशीचा धांवा ॥ पद चाल ॥

॥ द्रौपदी बहीण कृष्णाची । करी सेवा तुळशीची । गुज जाणतसे अंतरीची । पत्नी त्या विष्णुची । तुळशी पावगे सत्वर । कां झालिस निष्ठुर । मज र घालावी पांखर । करी दुष्टांचा संहार ॥ तुळशी पा० ॥ १ ॥ तुझे सन्मुख उभी राहे । आणिक देव न पाहे । धांवा करीतसे लवलाही । तूं येऊन करशिल साही ॥ तुळशी पा० ॥ २ ॥ तुझ्या येतांगे मंदिरी । माझे कापतील वैरी । त्यां धरावें मजकरीं । पतीव्रता नारी । तुळ० ॥ ३ ॥ रात्रंदिवस भजनांत । किती पाहशील अंत । यादव जोडिता तुज हात । पुरवीं मनोरथ । तुळशी० ॥ ४ ॥ धांवा ऐकोनियां करुणा आली । चतुर्भुज देखिली । मस्तक ठेवूनियां चरणावरी । तुळशी पावगे सत्वर । कां झालिस निष्ठुर । तुळशी० ॥ ५

## ॥ तुळशीची आरती ॥

॥ जयदेवी जयदेवी जयमाये तुळशी ॥ आरती ओवाळूं तुजला हरिवल्लभे तुळशी ॥ धृ० ॥ तुळशी वृंदावन ज्याचे घरीं ॥ धन्य धन्य तेची नारी संसारीं ॥ जन्माचें पुण्य नसे ज्याचे घरीं ॥ त्याचें उद्धार करील श्रीहरी ॥ जयदेवी० ॥ १ ॥ नित्य नेमें तुळशीस नमस्कारी ॥ त्यासी देवता येती यमधर्म पळे दूरी ॥ विष्णु त्याचा आदर करी ॥ तया भाग्याचा देव नाही दूरी ॥ जयदेवी० ॥ २ ॥ ज्या नारी नित्य करिती तुळसी पूजन ॥ नित्य त्यासी घडे श्रीहरीचें ध्यान ॥ देईल तीर्थ योग तयासी पूर्ण ॥ वैकुंठासी राहे वडे अनुदीन ॥ जयदेवी० ॥ ३ ॥ तुळशीपासीं आहे चैतन्य वनमाळी ॥ भक्तांसीं सांभाळी स्वयें चंद्रमौळी ॥ ज्या नारी भाव धरोनियां प्रातःकाळीं ॥ तुळसी देवीलागीं जोडिती अंजुळी ॥ जयदेवी० ॥ ४ ॥ ज्या नारी तुळशीचें पूजन करिती ॥ सदा सौभाग्यवती त्या होती ॥ पुत्रपौत्र तया मीळे संपत्ती ॥ हेंच तुळसीपूजनें तयाला मुक्ती ॥ जयदेवी० ॥ ५ ॥ उद्धवासी सांगे प्रभु नारायण ॥ तुळशीकथा ऐके एकाग्र करून ॥ मनोभावें गावें तुळशीआख्यान ॥ सदाशिवतनय होई पावन ॥ जयदेवी जयदेवी श्रीमाये तुळशी ॥ आरती ओवाळूं तुज० ॥ ६ ॥

## देवीचें ध्यान.

विद्युद्दाम समप्रभां मृगपतिस्कंधस्थितां भीषणां ॥
कन्याभिःकर वालखेट विलसद्धस्ताभिरा सेवितां ॥
हस्तैचक्रधरालिखेट विशिखां चापं गुणं तर्जनीं ॥
त्रिभ्राणामनलासिकांशशिधरांदुर्गांत्रिनेत्रांभजे ॥ १ ॥

## जगदंबेची स्तुती.

॥ ओव्या ॥

गांवांत प्रवेशले पंडुनंदन ॥ तंव देखिलें दुर्गास्थान ॥ धर्मराज करी स्तवन ॥ जगदंबेचें तेधवा ॥ १ ॥ जयजय दुर्गे भुवनेश्वरी ॥ यशोदे गर्भ संभव कुमारी ॥ इंदिरा रमण सहोदरी ॥ नारायणी चंडिकांबिके ॥ २ ॥ जयजय जगदंबे विश्व कदंबिणी ॥ मूळ स्फूर्ती प्रणव रूपिणी ॥ ब्रह्मानंद पददाइनी चिद्विलासिनी अंबिके ॥ ३ ॥ जयजय धराधर कुमारी ॥ सौभाग्य गंगे त्रिपुर सुंदरी ॥ हेरंब जननी अंतरी ॥ प्रवेशे तूं आमुचे ॥ ४ ॥ भक्त ह्दया रविंद भ्रमरी ॥ तुझे कृपावल्के निर्धारी ॥ अती मूढ निगमार्थ विचारी ॥ काव्यरचना करी अद्भुत ॥ ५ ॥ तुझिया कृपावलोकनेंकरून ॥ गर्भांधाला येतील नयन ॥ पांगूळ करी गमन दूर पंथें जाऊनी ॥ ६ ॥ जन्मादारभ्य जो मुका ॥ होय वाचस्पतीसम बोलका ॥ तूं स्वानंदसरोवर मराळिका ॥ होसी भाविकां प्रसन्न ॥ ७ ॥ आत्मानंदें

आदिजननी ॥ तवकृपेची नौका करोनी ॥ दुस्तर भवसिंधू उल्लंघोनी ॥ निवृत्तितटा जाइजे ॥ ८ ॥ जयजय आदि कुमारिके ॥ जयजय मूळपीठनायके ॥ सकळसौभाग्यदायके ॥ जगदंबिके मूळप्रकृती ॥ ९ ॥ जयजय भार्गवप्रिया भवानी ॥ भ्रमनाशने भक्तवरदायिनी ॥ सुभद्रकारके हिमनगनंदिनी ॥ त्रिपुरसुंदरी महामाये ॥ १० ॥ जयजय आनंदकासारमराळिके ॥ पद्मजनयने दुरितवनपावके ॥ त्रिविधताप भयमोचके ॥ सर्वव्यापके मृडानी ॥ ११ ॥ शिवमानस कनकलतिके ॥ शुंभनिशुंभ दैत्यांतके ॥ निजजन पाळके अपर्णे ॥ १२ ॥ तव मुखकमळशोभा देखोनी ॥ इंदुबिंब जाय विरोनी ॥ ब्रह्मादि देव बाळ तान्हे ॥ स्वानंदसदनीं निजविसी ॥ १३ ॥ जिवशीव दोनी बाळकें ॥ पाळिसी निजविशी कौतुकें ॥ स्वरूप तुझें जीव नोळखे ॥ पडला ह्मणोनी आवर्ती ॥ १४ ॥ शिवस्मरणीं सावध चित्त ॥ ह्मणोनि तो नित्यमुक्त ॥ स्वानंदपद होतास येत ॥ तुझे कृपे जननीये ॥ १५ ॥ मेळवुनी पंच भूतांचा मेळ ॥ त्वां रचिला ब्रह्मांडगोळ ॥ ईच्छापरत तात्काळ ॥ निर्मून हारपें करिशी तूं ॥ १६ ॥ अनंतबाळ अनित्य असोनी ॥ तवं अभिनाओं गेल्या लपोनी ॥ सकळ सौभाग्य कल्याणी ॥ रमारमणवरदायिके ॥ १७ ॥ षड्रीपु हरकाळिने ॥ त्रैलोक्यनगराभरणे ॥ आदिमाये आत्म प्रभे ॥ सकळारंभे मूळप्रकृती ॥ १८ ॥ जय करुणामृतसरीते ॥ भक्तपाळके गुणभरिते ॥ अनंतब्रह्मांड फळांकिते ॥

आदिमाते अन्नपूर्णे ॥ १९ ॥ सच्चिदानंदे प्रणवरूपिणी ॥ चराचर सकळ व्यापिनी ॥ सर्गस्थित्यंतकारिणी ॥ भवमोचनी ब्रह्मानंदे ॥ २० ॥ ऐकोन धर्माचें स्तवन ॥ दुर्गा झाली सुप्रसन्न ॥ ह्मणे तुमचे शत्रु संहारीन ॥ राज्यीं स्थापीन धर्मातें ॥ २१ ॥ तुह्मी वास करा येथ ॥ प्रगटो नेदी मी जनांत ॥ शत्रू क्षय पावती समस्त ॥ सुख अद्भुत होईल ॥ २२ ॥ त्वां जें स्तोत्र केलें पूर्ण ॥ तें जे त्रिकाळ करिती पठण ॥ त्यांचे सर्व काम पुरवीन ॥ सदा रक्षीन अंतरबाह्य ॥ २३ ॥

## ॥ अंबेचीं अष्टकें प्रारंभ ॥

॥ अंबे महा त्रिपुरभैरवि आदिमाये ॥ दारिद्र्य दुःख भय हारून दावि पाय ॥ तुझा अगाध महिमा वदति पुराणीं ॥ श्री रेणुके भगवती वरदे भवानी ॥ १ ॥ आतां क्षमा करि शिवे अपराध माझा ॥ मी मूढ केवळ असे परि दास तूझा ॥ तुझें चरित्र जननी जनीं नित्य मानी ॥ श्रीरेणु० ॥ २ ॥ लज्ज्या समस्त तुजला मज बालकाची ॥ तूं माउली असमिगे कुरु बालकांची ॥ व्हावें प्रसन्न करुणा परिसोन कानीं ॥ श्रीरेणु० ॥ २ ॥ हें जालिलें भय वृथा भुललों प्रपंचीं ॥ तेणें करूनि स्थिरता न घडे मनाची ॥ दुःखोदधींत बुडतों धरि शीघ्र पाणी ॥ श्री रेणु० ॥ ४ ॥ निष्ठूरता जरि मनीं धरिशील आई ॥ रक्षील कोण मज सांग उपाय कांहीं ॥ तूं भक्तवच्छल कृपानिजबोसमानी ॥ श्रीरेणु० ॥ २ ॥ नेणूं पदार्थ तुजवांचुन आणि कांहीं ॥

तूं मायबाप अवघे गणगोत पाही ॥ तुजवांचुन देव दुसरा हृदयांत नाणी श्रीरेणु० ॥ ६ ॥ तूं धन्य या त्रिभुवनांत समर्थ ऐसी ॥ धाकें तुझ्या पळ सुटे खलदानवासी ॥ येसि पूजेसि तुंगे बैसुनियां विमानी ॥ श्रीरेणु० ॥ ७ ॥ जाळी-तसे अनुदिनीं अनुताप अंगीं ॥ यांचें निवारण करीं मज पाव वेगीं ॥ आनंदसिंधुलहरी गुण कोण वानी ॥ श्रीरेणु० भगवती० ॥ ८ ॥

## ॥ अंबिकेचें अष्टक २ रें ॥

॥ जयपरात्परे पूर्ण चिन्मये । भगवति महा मंगलालये ॥ सदय ईश्वरीं विश्वव्यापिके । शरण तूज मी पाव रेणुके ॥ १ ॥ दीनवत्सळे पाय दाखवी । त्रिपुरभैरवी या भवार्णवीं ॥ अवरि ताप तूं ज्ञानदायके । शरण तूज० ॥ २ ॥ परम मूढ मी जाण निश्चयें । घड मला शिवे नामही नये ॥ ह्मणवितों तुझा रंक कालिके ॥ शरण तू० ॥ ३ ॥ विषय काननीं टाकिलें मला । मार्ग चूकलों ध्यातसें तुला ॥ तव कृपेविणें भय कसें चुके । शरण तू० ॥ ४ ॥ कांहिं नाठवे विचार हा मनीं । भ्रांत सर्वदा दिवस यामिनीं ॥ प्रगट हो अतां ज्ञानदीपिके । शरण तू० ॥ ५ ॥ आश्रयो नसे तुजविणें जनीं । बालकासि कां टाकिलें वनीं । धांव घे कडे माय अंबिके । शरण तू० ॥ ६ ॥ हेंच मागणें माझिये मनीं । हृदयग्रंथिका छेद येऊनी ॥ माय तूं अम्हां भक्तपोषके । शरण तू० ॥ ७ ॥ विषयजाळ हें जाचतें मी । कामक्रोध हे व्याघ्र गर्जती ॥ रक्षि संकटीं भ्रांतिना-

शक्के । शरण तूं० ॥ ८ ॥ श्रीदयानिधे त्रिपुरसुंदरी । सर्व साक्षि तूं भेट लौकरी ॥ गोसाविनंदन विनवि चंडिके । शरण तूं० ॥ ९ ॥ ओवी ॥ जगन्माता जगदेश्वरी । काय सांगावी तिची थोरी । निजभक्तांचि कैवारी । ऐसी जगदंबा ही आहे ॥ १ ॥ श्लोक ॥ त्रिपुरसुंदरी पाव सत्वरी । तुजविणें अई कोण करि धरी ॥ जन्ममरण हें चुकवि माउली । तव कृपेचि हे करिगे साउली ॥१॥

## ॥ शंकराचे नमस्कार ॥

॥ दाशार्हरायें गुरुराज केला । गर्गाश्रमातें स्वयें तोचि गेला ॥ कलावतीनें पति उद्धरीला । नमस्कार माझा उमा शंकराला ॥ १ ॥ चढोनि वृक्षावरि व्याघ्र पाही । तो बिल्वपत्रास शिवास वाही ॥ मृगासवें तोहि मुक्तीस नेला । नमस्कार० ॥ २ ॥ शैविमहात्म्यीं कृपिनें कथीलें । चांडाळनारीस विमान आलें ॥ कल्माषपादा जगिं उद्धरीला ॥ नमस्कार० ॥ ३ ॥ अवंति नगरी अद्भूत लीला । कीं चंद्रसेना मणि प्राप्त झाला ॥ बहू भाग्य आलें त्या बाळकाला । नमस्कार० ॥ ४ ॥ हा धर्मगोसा अले राजपुत्र । शांडिल्य सांगे कथा ही पवित्र ॥ अंशूमतीला वर तोचि झाला । नमस्कार ॥ ५ ॥ भूप चित्रवर्माहि नांदे महीतें । ज्यामात केलें त्या चित्रांगदातें ॥ सौभाग्य आलें हो सिमंतिनीला । नमस्कार० ॥ ६ ॥ शिवयोगियाच्या धरितांचि पाया । अरोग्य केलें त्या भद्रासुराया ॥ पहा चित्रबाहूसहो पुत्र झाला । नमस्कार० ॥ ७ ॥ कापट्य

कळतांचि सिमंतिनीला । पुरूष असतां स्त्री तोच झाला ॥ अंबा वदे हेंच असे नृपाला । नमस्कार० ॥ ८ ॥ भद्रायुचें सत्व खरें पहाती । मायेसहीत शिवप्राप्त होती ॥ महिमा सद्गुरू सांगे अगाध त्याला । नमस्कार० ॥ ॥ ९ तरे वामदेवासवें दैत्य काली । चिताभस्मयोगें शंकरातुनेळीं ॥ नृप सिंहकेतासह मुक्त केला । नमस्कार० ॥ १० ॥ जन निंदिती व्यर्थ पतिव्रतेतें । द्वय नेत्र आले नयनप्रभुवातें ॥ तदा पावली अंबिका शारदेला । नमस्कार० ॥ ११ ॥ पराशरानें सुजनां कथीलें । नृप भद्रसेने अनुष्ठान केलें ॥ शतायुष्य केलें तया बाळकाला । नमस्कार० ॥ १२ ॥ बहूला पतीच्यासवें मुक्त झाली । भस्मासुरानें बहु ख्याति केली ॥ मोहिनीच होणें पडलें हरीला । नमस्कार० ॥ १३ ॥ तो पातकी दक्ष निंदी शिवातें । पुन्हा पार्वतीनें वरिलें हरातें ॥ तो कार्तिकस्वामि जन्मासि आला । नमस्कार० १४ ॥ १४ ॥ पतीकारणें भिल्लिणी वेष अंबा । वनीं येत शोधीत सांबा ॥ घरीं आणिला मोहुनि त्या शिवाला ॥ नमस्कार० ॥ १५ ॥ संतुष्ट तेव्हां जगतीं सशक्ती । करीत शंभूस श्रियाळभक्ति ॥ तया चांगुणेच्यासवें दे सुमुक्ती ॥ नमस्कार० ॥ १६ ॥

## ॥ नारसिंहाचे नमस्कार ॥

॥ पतिव्रता धर्महि सोडवेना । अज्ञा पतीची मज मोडवेना ॥ नारायणा पावशि सांग केव्हां । नमस्कार माझा प्रभो नारसिंहा ॥ १ ॥ कयाधू ह्मणे मी करूं काय देवा ।

कसा लाधला हा महा पुत्रठेवा ॥ महाविष कैसें सुधासाम्य तेव्हां । नमस्कार० ॥ २ ॥ महाभक्त तो गांजिलाहो पित्यानें । परी संकटीं देव धांवे त्वरेनें ॥ प्रभूची कृपा बुद्धि झालीच तेव्हां । नमस्कार० ॥ ३ ॥ नगीं लोटिता दैत्य क्रोधें तयासी । तदा संकटीं धांवला व्योमकेशी ॥ प्रल्हादमोदें गृहीं येत तेव्हां । नमस्कार० ॥ ४ ॥ महा हस्तिपायीं कुपुत्रास द्यावा । महासागरीं नेउनी बूडवावा ॥ वदे दैत्यराणा समस्तास तेव्हां । नमस्कार० ॥ ५ ॥ ढकला ह्मणे आणिल्यें सुतासी । तिथे त्यासि रक्षीत वैकुंठवासी ॥ अती कोप आला जनकासि तेव्हां । नम० ॥ ६ ॥ उभा तो सभे पाहतां क्रोध आला । कुठे देव तूझा वदे बाळकाला ॥ स्तंभीं धरी रूप विक्राळ तेव्हां । नमस्कार० ॥ ७ ॥ पिता पुसतो देव कोठें आहेरे । वदे सूत स्तंभीं पहा गुरगुरीरे ॥ करो स्तंभि लत्ताप्रहारासि तेव्हां । नमस्कार० ८ ॥ अति कोप आला असे श्रीहरीला । कुजावोनि घेई तया बाळकाला ॥ संतुष्ट झाले प्रभुराज तेव्हां । नमस्कार० ॥ ९ ॥ कसाधू ह्मणे धन्य त्या बाळकाला । पिता पातकी मुक्तिपंथासि नेला ॥ अति भक्तिभावें हरी तोषवीला । नमस्कार माझा प्रभो श्रीहरीला ॥ १० ॥

## ॥ दशावताराचे नमस्कार ॥

॥ शंखासुरानें कसे वेद न्हेले । स्वयें मच्छरूपा हरीनें धरीलें ॥ विधीला दिले आणुनि वेद चारी । नमस्कार माझा तुम्हाला मुरारी ॥ १ ॥ पयोनिधीच्या जायें मंथ-

झाला ॥ सुरासुरांनींच अरंभ केला ॥ तयी कच्छ होवोनि-या मंदराला । धरी पृष्ठिं माझा नमस्कार त्याला ॥ २ ॥ हिरण्याक्ष तो माजला दैत्य मानी । वराहस्वरूपें धरोनी पुराणीं ॥ अशी थोरहो ख्याति केली जगांत । नमस्कार त्याही वराहास नित्य ॥ ३ ॥ महाभक्त तो गांजिला हो पित्यानें । धरी रूप स्तंभीं अति तो त्वरेनें ॥ नृसिंहें व-धीलें असूरास तेंव्हां । नमस्कार माझा तया नारसिंहा ॥ ४ ॥ त्रिपाद भूर्मी दिलीहो बळीनें । पहा ख्याति केली कशी वामनानें ॥ पाताळलोकीं हरी न्हे बळीला । नमस्कार माझा तया वामनाला ॥ ५ ॥ महा रेणुका माउलीहो जयाची । बहू केलि सेवा सुदें पीतयाची ॥ दिलें राज्य देवें द्विजेंद्रासदामा । नमस्कार माझा अशा पर्शुरामा ॥ ६ ॥ दशास्यें बहू निर्जरालें छळीलें । ह्मणोनीचहो राम जन्मा-सि आले ॥ वधोनी तया रावणा मुक्त केला । नमस्कार माझा तया राघवाला ॥ ७ ॥ हरी बंदिशाळेंत जन्मासि झाला । पहा जन्मतां गोकुळातोंवि गेला ॥ प्रभूनीं दिली मुक्ति त्या कंसराया । नमस्कार माझा तया कृष्णराया ॥ ८ ॥ कलीच्या स्तुतीनें हरी बुद्ध झाला । तदा त्या कलीला बहू गर्व झाला ॥ नामांमृतें उद्धरिलें जिवा-ला । ह्मणोनि नमस्कार त्या बौद्धजीला ॥ ९ ॥ कलिंकलि होवोनियां हो खळाचें । हरीलें स्वयें अश्वि बैसोनि हस्तें । शिरे नेति धर्मास होईल नेता ॥ नमस्कार माझा अशा कल्किनाथा ॥ १० ॥

## ॥ कालभैरवाष्टक ॥

॥ देवराजसेव्यमानपावनांघ्रिपंकजं ॥ व्यालयज्ञसूत्रमिंदुशे-
खरं कृपाकरं ॥ नारदादियोगिवृंदवंदितंदिगंबरं ॥ काशि-
कापुराधिनाथकालभैरवंभजे ॥ १ ॥ भानुकोटिभास्वरंभ-
वाब्धितारकंपरं ॥ नीलकंठमीप्सितार्थदायकंत्रिलोचनं ॥
कालकालमंबुजाक्षमक्षशूलमक्षरं ॥ काशिकापुरा० ॥ २ ॥
शूलटंकपाशदंडपाणिमादिकारणं ॥ श्यामकायमादिदेवम-
क्षरंनिरामयं ॥ भीमविक्रमंप्रभुंविचित्रतांडवप्रियं ॥ काशि-
कापुराधि० ॥ ३ ॥ भुक्तिमुक्तिदायकंप्रशस्तचारुविग्रहं॥
भक्तवत्सलंस्थितंसमस्तलोकविग्रहं ॥ निक्वणन्मनोज्ञहेमरत्न
किंकिणीलसत्कटिं ॥ काशिकापुराधि० ॥ ४ ॥ धर्मसेतुपा-
लकंत्वधर्ममार्गनाशकं ॥ कर्मपाशमोचकंसुशर्मदायकंविभुं ॥
स्वर्णवर्णशेषपाशशोभितांगमंडलं ॥ काशिकापुराधि० ॥५॥
रत्नपादुकाप्रभाभिरामपादयुग्मकं ॥ नित्यमद्वितीयमिष्टदै-
वतंनिरंजनं ॥ मृत्युदर्पनाशनंकरालदंष्ट्रमोक्षणं ॥ काशिका-
पुराधि० ॥ ६ ॥ अट्टहासभिन्नपद्मजांडकोशसंततिं ॥
दृष्टिपातनष्टपापजालमुग्रशासनं ॥ अष्टसिद्धिदायकंकपाल-
मालिकंधरं ॥ काशिकापुराधि० ॥ ७ ॥ भूतसंघनायकं
विशालकीर्तिदायकं ॥ काशिवासलोकपुण्यपापशोधकंविभुं॥
नीतिमार्गकोविदंपुरातनंजगत्पतिं ॥ काशिकापुराधि० ॥८॥
कालभैरवाष्टकंपठंतियेमनोहरं ॥ ज्ञानमुक्तिसाधनंविचित्र
पुण्यवर्धनं ॥ शोकमोहदैन्यलोभकोपतापनाशनं ॥ तेप्रयांति
कालभैरवांघ्रिसन्निधिंध्रुवं ॥ ९ ॥

## ॥ शनिस्तुतिः ॥

॥ ब्रह्मा पुरारी त्रिपुरांतकारी भानु शशी भूमिसुतो बुधश्च ॥ गुरुश्चशुक्रः शनि राहु केतवः ॥ कुर्वंतु सर्वे मम सुप्रभातं ॥

## अथ शन्याष्टक

नमो सूर्यसूता तुझी धन्य कीर्ती ॥ न चाले मती वर्णितां स्तब्ध होती ॥ लिला नाटकी अंत ना पार माया ॥ अहा धन्य तूझी शनीदेवराया ॥ १ ॥ आलां स्वारि ती गोचरीं दृष्टिठाईं ॥ सखे सोयरे इच्छिती दुष्टताही ॥ धना हानि होती नसे कांहीं माया ॥ अहा धन्य० ॥ २ ॥ सदा दुःख होवोनिया द्वेष वाटे ॥ कुडे पावडे येति नस्तीच गाठें ॥ न भेटे कधीं यत्न जातात वाया ॥ अहा० ॥ ३ ॥ नसे कोठें कांहीं मनीं जो सुवारा ॥ पडे अंतरीं येउनी दुःख भारा ॥ करूं इच्छिता गोष्ट जाती अपाया ॥ अहा धन्य० ॥ ४ ॥ कटुंबांत जी प्रीय होती जिवाची तिही फारली दुष्ट झाली मनाची ॥ नको क्लेश दारू करी पूर्ण छाया ॥ अहा धन्य० ॥ ५ ॥ नसे चैन कांहीं उदासी मनातें ॥ तुझ्या वांचुनि कोण देशांति त्यातें ॥ नसे जाणुनी प्रार्थिलें तूंजगाया ॥ अहा० ॥ ६ ॥ उठे चित्ति चिंता जिवा रोग लागे ॥ झटे झोंबटें लागती पाठिमागें ॥ अहोरात्र तो त्रास वाटे जिवा या ॥ अहा धन्य० ॥ ७ ॥ अगाधीत लीला तुझी कोण वाणी ॥ तुझ्या दृष्टिपातें थके शूलपाणी ॥ गिरी कंदरीं लाविला त्या फिराया ॥ अहा

धन्य० ॥ ८ ॥ कथा ऐकिली सर्वही विक्रमाची ॥ आली त्या परी संधि-वाटे अताची ॥ महत्संकटें येति कंठीं भिडाया ॥ अहा० ॥ ९ ॥ फुटे छाति ही ऐकता साडे-साती ॥ अता ती अली माझिया कर्मपातीं ॥ कृपावंत तूं हात देगा तराया ॥ अहा धन्य० ॥ १० ॥ किती दुःख सांगू नसे पार याला ॥ नसे थार कोठें वसाया मनाला ॥ कृपाळुपणें पाहि तूं होय वाली ॥ मिठी त्वत्पदीं बाळ रखमाजि वाली ॥ ११ ॥ इति शनिस्तुति समाप्त ॥

## नवग्रहास नमस्कार.

अता वीनवीतें रवीराज देवा ॥ करोनी कृपा पालटा कर्म ठेवा ॥ पदीं लागतां भानु संतुष्ट झाला ॥ नमस्कार माझा तया भास्कराला ॥ १ ॥ असें वीनवितें ग्रहा सोमनाथा ॥ करावी कृपा पाइ ठेवीन माथा ॥ करोनी पुजा पाइ संतुष्ट झाला ॥ नमस्कार माझा तया सोमजीला ॥ २ ॥ करा वंदना जो ग्रहा मंगळाते ॥ धरी हस्तकीं दीन या बाळकातें ॥ जपे तोषवावें धरेच्या सुताला नमस्कार माझा अशा मंगळाला ॥ ३ ॥ अशी ही विनंती बुधा भूपराया ॥ नसे सुख कांहीं कसे कष्ट वाया ॥ धरा हस्तकां हो मला बाळकाला ॥ नमस्कार माझा शशीचे सुताला ॥ ४ ॥ गुरूचे पदीं चित्त या मानसाचें ॥ दया सागरा प्रेम साहो कृपेचें ॥ भवाब्धी मधें हात देगा तराया ॥ नमस्कार माझा गुरूराज पाया ॥ ५ ॥ किती वर्णु हो शुक्र देवा कृपाळा ॥ जया शर्ण आला असे दैत्य मेळा ॥ असूरा

कळेना अगाधीत माया ॥ नमस्कार माझा तुझा शुक्राया बहू पीडिलें विक्रमाला शनीनें ॥ पुन्हा राज्य दीलें तयाला सुखानें ॥ दयेनें पहाता करी द्रव्य काया ॥ नमस्कार माझा शनीदेवराया ॥ ७ ॥ महाराज तूं रे कृपावंत राहू ॥ नको कष्ट देऊं किती दुःख साहू ॥ नभीं पीडिसी तूं कसा चंद्रराया ॥ नमस्कार माझा तुझा राहुराया ॥ ८ ॥ अता तीनवावें तया केतवाते ॥ नभीं तोच माझी पहा मानवाते ॥ करोनीच दानें तया तोषवीला ॥ नमस्कार माझा तया केतवाला ॥ ९ ॥ पुढीं नित्य गाती नव जे ग्रहाते ॥ पिडा केश ना दे कदाहीं तयांतें ॥ मन सौख्य यानें मनोरें तुझ्यासी नका कष्ट रुक्मिणी दीन दासी १०

## ॥ विष्णोरष्टाविंशति नामस्तोत्र ॥

अर्जुनोवाच ॥ किन्नुनामसहस्राणिजपतेचपुनःपुनः ॥ यानिनामानिदिव्यानितानिचाचक्ष्वकेशव ॥ १ ॥ श्रीभगवानोवाच ॥ मत्स्यंकूर्मंवराहंचवामनंचजनार्दनं ॥ गोविंदंपुंडरीकाक्षंमाधवंमधुसूदनं ॥ २ ॥ पद्मनाभंसहस्राक्षंवनमालिंहलायुधं ॥ गोवर्धनंहृषीकेशंवैकुंठंपुरुषोत्तमं ॥ ३ ॥ दामोदरं श्रीधरंचवेदांगंगरुडध्वज ॥ ४ ॥ अनंतकृष्णगोपालंजपतो नास्तिपातकं ॥ गवांकोटिप्रदानस्यअश्वमेधशतस्यच ॥ ५ ॥ कन्यादानसहस्राणांफलंप्राप्नोतिमानवः ॥ अमायावापौर्णिमा याएकादश्यांतथैवच ॥ ७ ॥ संध्याकालेस्मरेन्नित्यंप्रातः कालेतथैवच ॥ माध्यान्हेचजपेन्नित्यंसर्वपापैःप्रमुच्यते ॥ ७ ॥

## अर्जुनाची दश नांवें.

अर्जुनफाल्गुनजिष्णुकिरीटीआणिश्वेतवाहनु ॥ बिभत्छु विजयीकृष्ण सव्यसाचीधनंजय ॥ दश नामे जपतां ओटें विघ्नें पळतील बारा वाटें ॥ विजय लक्ष्मी बैसेल पाटीं ॥ दारिद्र्यदृष्टी दिसेनां ॥ २ ॥

## ॥ नर्मदाष्टक ॥

सबिंदुसिंधुसुस्खलत्तरंगभंगरंजितं द्विषत्सुपापजातजातकारि वारिसंयुतम् ॥ कृतांतदूतकालभूत भीतिहारिनर्मदेत्वदीय पादपंकजंनमामिदेविनर्मदे ॥ १ ॥ त्वदंबुलीनदीनमीनदिव्य संप्रदायकंकलौमलौघभारहारिसर्वतीर्थनायकम् ॥ सुमच्छ कच्छनक्रनक्रचक्रवाकशर्मदे त्वदीय पादपंकजंनमामि देविन र्मदे ॥ २ ॥ महागभीरनीरपूरपापधूतभूतलं । ध्वनत्समस्त पातकारिदारितापदाचलम् ॥ जगल्लयेमहाभयेमृकंडसूनुहर्म्य देत्वदीय० ॥ गतंतदैवमेभवंत्वदंबुवीक्षितंयदामृकंडसूनुशौ नकासुरारिसेविसर्वदा ॥ पुनर्भवाब्धिजन्मजंभवाब्धिदुःख नर्मदेत्वदीय० ॥ ४ ॥ अलक्षलक्ष किन्नरासुरासुरादिपू-जितंसुलक्षनीरतीरधीरपक्षिलक्षकूजितम् ॥ वसिष्ठशिष्टपिप्प लादिकर्दमादिशर्मदेत्वदीय० ॥ ५ ॥ सनत्कुमारनाचिकेत कश्यपात्रिषट्पदैः धृतंस्वकीयमानसेषुनारदादिषट्पदैः ॥ रवीं दुरंतिदेवदेवराजकर्मशर्मदेत्वदीय० ॥ ६ ॥ लक्षलक्षलक्ष पापलक्षसारसायुधं तसत्कजीवजंतुतंतुभुक्तिदायकम् ॥ विरिं-चिविष्णु शंकरस्वकीयधामवर्मदेत्वदीय० ॥ ७ ॥ आहो-मृतंस्वनंश्रुतंमहेशकेशजातटे किरातसूतवाडवेषुपंडितेशठे

नते ॥ दुरंतपापतापहारिसर्वजंतुशर्मदेत्वदीय० ॥ ८ ॥ इदं तुनर्मदाष्टकंत्रिकालमेवयेसदापठंतितेनिरंतरंनयातिदुर्गतिंकदा ॥ सुलभ्यदेहदुर्लभंमहेशधामगौरवंपुनर्भवानरानवैविलोकयंतिरौरवम् ॥ ९ ॥ इतिश्रीमच्छंकराचार्यविरचितंनर्मदाष्टकंसंपूर्णम् ॥

## ॥ आरती रामांची. ॥

निशी झाली सिता सांगे हनुमंता ॥ रामबोलावूनी आणिसत्वता ॥ बहुत रात्र झाली सांगा रघुनाथा ॥ सुमन सेजेवरीं पहुडावे आतां ॥ जयदेव जयदेव जय आत्मारामा ॥ वोवाळीते सिता तुज मेघशामा ॥ जयदेव० ॥ १ ॥ कामक्रोध लोभ केरकाढूनी ॥ भक्ती रंगवल्या तेथे घालूनी ॥ अंतर आरशे भिंतीलावूनी ॥ सत्व कापुराचा दिप लावूनी ॥ जयदेव० ॥ २ ॥ भक्ती रूप तेल ज्ञान दिपाला ॥ अज्ञानअंधःकार समूळ निरसला ॥ वैराग्य चांदवा वरी बांधीला ॥ नवनिधी चिपी सुमन सेजेला ॥ जयदेव० ॥ ३ ॥ हिररत्न पाटीराम बसवीले ॥ मानस सरोवराचें तीर्थ आणले ॥ त्रिविध तापजाळुनि उष्णोदक केलें ॥ राम चरणा प्रिती प्रक्षालन केलें ॥ जयदेव० ॥ ४ ॥ मन मोगऱ्याचा हार घातीला ॥ चित सेवंतीचा तुरा खोवीला ॥ कान अहंकार धूप जाळीला ॥ नाना उपचारें पूजी रामाला ॥ जयदेव० ॥ ५ ॥ वासना फोडुनि चुर्ण केली सुपारी ॥ भावार्थ कापुरामध्यें घोळिलिनिर्धारीं ॥ शांती नागवेली पाने गंगेरी ॥ निपण जाळुनी चुना लाविलावरी ॥ जयदेव० ॥ ७ ॥

विड्यावेलदोडे क्रोध लवंगा ॥ शांती जायफळपत्री सुरंगा ॥ एकत्र विडा करूनि आर्पी रामांगि ॥ भक्षुनिया रघुपति पहुडेपलंगी ॥ जयदेव० ॥ ७ ॥ देही विदेही ह्या दोघी दासी ॥ रामचरण सेवा करती भावेशीं ॥ अंतरिचें गूज सांगे सीता रामाशी ॥ जाग्रति स्वप्नसुषुप्ति तुरिया स्थितीशी ॥ जयदेव० ॥ ८ ॥

समाप्त

REFBK-0019499